# मुंबई विद्यापीठ

मसुदा

क्र. २-२०१४-२०१५

अधिसभा

२४ व २५ मार्च, २०१५

अधिसभेची वार्षिक सभा विद्यापीठाचे सर कावसजी जहांगीर सभागृह (दीक्षांत सभागृह), येथे मंगळवार दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली आणि ही सभा बुधवार, दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा सुरू झाली. सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते -

| | | २४ मार्च | २५ मार्च |
|---|---|---|---|
| १. | डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू) | P | P |
| २. | डॉ. नरेश चंद्र (प्र-कुलगुरू) | P | P |
| ३. | प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे | P | P |
| ४. | डॉ. मृदुळ जगन्नाथ निळे | P | P |
| ५. | श्री. भुजंग किसनराव अहिरे | P | P |
| ६. | डॉ. दिलीप शंकरराव पाटील | P | P |
| ७. | प्राचार्य रविंद्रन कर्थाडी | P | P |
| ८. | प्राचार्या (श्रीमती) मंजुळा जेठानंद निचाणी | P | P |
| ९. | प्राचार्य (डॉ.) गोरक्ष विठ्ठल पारगांवकर | P | P |
| १०. | प्राचार्य नारायण मधूकर राजाध्यक्ष | P | P |
| ११. | प्राचार्य मारोती तुळशिराम भगत | P | P |
| १२. | प्राचार्य (डॉ.) विष्णू नंदा मगरे | A | P |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | प्राचार्य (डॉ.) मुरलीधर एस. कु-हाडे | P | P |
| १४. | प्राचार्या (श्रीमती) ॲन्सी जोस | P | A |
| १५. | प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव यशवंतराव पाटील | P | P |
| १६. | प्राचार्या (श्रीमती) चैताली तापस चक्रवर्ती | P | A |
| १७. | प्राचार्य (डॉ.) कृष्णा अप्पया पाटील | P | P |
| १८. | प्राचार्य विठ्ठल बळीराम रोकडे | P | P |
| १९. | प्राचार्य सुधीर रामचंद्र भोसले | P | P |
| २०. | प्राचार्या (श्रीमती) हर्षा कमलेश मेहता | P | A |
| २१. | प्राचार्या (श्रीमती) प्रमिला श्रीकांत राऊत | P | P |
| २२. | प्राचार्य (डॉ.) सिद्धेश्वर तुकाराम गडदे | P | P |
| २३. | श्री. झहीर इशाक काझी | P | A |
| २४. | श्री. हसमुख देवजी रांभीया | P | A |
| २५. | श्री. महेश काशिनाथ म्हात्रे | P | P |
| २६. | श्री. वसंतरावजी गणेशमल ओस्वाल | P | A |
| २७. | श्री. संजय बाबुराव शेटे | P | P |
| २८. | श्री. भिकू रामजी इदाते | P | P |
| २९. | डॉ. एम.ए.खान (सचिव) | P | P |
| ३०. | डॉ.(श्रीमती) मोहसिना मुकादम | P | P |
| ३१. | डॉ. आद्याप्रसाद पांडये | P | P |
| ३२. | डॉ. शितलाप्रसाद दुबे | P | P |
| ३३. | डॉ. (श्रीमती) शशिरेखा सुरेश कुमार | P | P |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४. | डॉ.(श्रीमती) संगिता अतुल गोडबोले | P | P |
| ३५. | डॉ. बिंदूप्रकाश बेचन मिश्रा | P | P |
| ३६. | डॉ. संजय कुमार | P | P |
| ३७. | डॉ. (श्रीमती) अनुराधा संदिप मझुमदार | P | P |
| ३८. | डॉ. विवेक बळवंतराव देशमुख | P | P |
| ३९. | डॉ. अभय नामदेवराव बांबोले | P | P |
| ४०. | डॉ. (श्रीमती) सुनिता दशरथ खारीवाल | P | P |
| ४१. | डॉ. प्रल्हाद गंगाराम पवार | P | P |
| ४७. | डॉ. दिपक गंगाधरराव बीडवई | P | P |
| ४८. | डॉ. (श्रीमती) माधवी सुधीर निकम | P | P |
| ४९. | डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद | P | P |
| ५०. | डॉ. (श्रीमती) अनुपमा जयवंत सावंत | P | P |
| ५१. | डॉ. वसंत सिताराम शेकडे | P | P |
| ५२. | डॉ. विजय नामदेव पवार | P | P |
| ५३ | डॉ. (श्रीमती) सुप्रिया दि. करंडे | P | P |
| ५४. | श्री. महादेव बाबुराव जगताप | P | P |
| ५५. | श्री. प्रदीप बाळकृष्ण सांवत | P | P |
| ५६. | श्री. सुधाकर शंकर तांबोळी | P | P |
| ५७. | श्री. गणेश सदाशिव चव्हाण | P | P |
| ५८. | श्रीमती निलीमा नंदकुमार भुर्के | P | P |
| ५९. | श्री. संजय तुळशीराम वैराळ | P | P |

| | | | |
|---|---|---|---|
| ६०. | श्री. शशिकांत काशिनाथ झोरे | P | P |
| ६१. | श्री. राजन वसंत कोळंबेकर | P | P |
| ६२. | प्राचार्य मुरलीधर गोविंदराव चांदेकर | P | P |
| ६३. | प्रा. अंबादास येलोजी मोहिते | P | P |
| ६४. | श्री. प्रकाश विठ्ठल पागे | P | A |
| ६५. | श्री. सलीम बापुमिया पटेल | P | P |
| ६६. | प्रा. (श्रीमती) रूपा भोगीलाल शहा | P | P |
| ६७. | डॉ. राजन मोरेश्वर तुंगारे | P | A |
| ६८. | डॉ. उदय साळुंखे | P | A |
| ६९. | डॉ. (श्रीमती) कविता रामचंद्र लघाटे | P | P |
| ७०. | डॉ. प्रल्हाद गंगाराम जोगदंड | P | P |
| ७१. | डॉ. (श्रीमती) माधुरी किरण पेजावर | P | P |
| ७२. | डॉ. सुरेश किसनराव उकरंडे | P | P |
| ७३. | डॉ. टी. पी. मधू नायर | P | P |
| ७४. | श्री. दिलीप दगडू पवार | P | P |
| ७५. | डॉ. बाळकृष्ण विठ्ठल भोसले | P | P |
| ७६. | डॉ. गंगाधर आसाराम मेश्राम | P | P |
| ७७. | डॉ. (श्रीमती) सुनिता विठ्ठलराव मगरे | P | P |
| ७८. | डॉ. (श्रीमती) शेफाली रसेंद्रा पंडया | P | P |
| ७९. | डॉ. रामभाऊ महादू बडोदे | P | P |

सभेची सुरूवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

अधिसभेच्या कामकाजाला सुरूवात करताना मा. कुलगुरूंनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

तसेच सन्माननीय सदस्य श्री. दादा इदाते यांची विमुक्त जनजाती आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आणि सन्माननीय सदस्य श्री. प्रदिप सावंत यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले.

यानंतर अधिसभेने डॉ. (श्रीमती) एम. एस. मोलवणे, प्राचार्य दिलीप गंभीर बोरसे या सन्माननीय सदस्यांची अधिसभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य करण्यात आली.

त्यानंतर सभागृहाने श्री. सदाशिव आमरापूरकर, डॉ. अशोक केळकर, श्री. एम. व्ही. कामत, श्रीमती. सुमती टिकेकर, श्रीमती शोभा अभ्यंकर, आमदार गोविंद राठोड, श्री. नरेश पाटील, श्री. सुंदरराव सोळंके, श्री. अतुल अभ्यंकर, श्री. रवि चोप्रा, श्री. चंद्रशेखर संत, श्रीमती हिराबाई विठ्ठल भोसले, श्री.मुरली देवरा, श्री.भालचंद्र उदगावकर, डॉ. माधवी सरदेसाई, श्री. भा.वि.जोशी(सर), श्री. गंगाराम तळेकर, डॉ. वसंत गोवारीकर, डॉ. आर.टी. साने, श्रीमती. सरिता पदकी, आमदार श्री. बाळा सावंत, अभिनेता श्री. प्रशांत पाटील, श्री. आत्माराम भेंडे, माजी उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील(आबा), कॉ. गोविंद पानसरे, श्री. अजय वढावकर, श्री. श्रीधर गुप्ते, श्रीमती. कृष्णा कल्ले, डॉ.(श्रीमती) विजया मनेरीकर, शाहिर कृष्णाराव साबळे, श्री. सुरेश गुजर, ॲड. रावसाहेब शिंदे, दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जवखेडा गावातील एका दलित कुटुंबातील तीन व्यक्तींची काही समाज कंटकांनी हत्या केली, तसेच मुंबई विद्यापीठातील ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे दु:खद निधन झाले त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून एक मिनिट उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

**अभिनंदन –**

➢ कोल्हापूरचे ख्यातनाम आर्किटेक्ट शिरिष बेरी यांना आर्किटेक्चर डिझाईन ॲण्ड सेरा ॲवॉर्डस २०१४ चा हॉल ऑफ फेम हा पुरस्कार जाहीर झाला.

➢ भारत आणि जपानचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना जपानचा प्रतिष्ठेचा पुरस्कार 'द ग्रँड कॉर्डन ऑफ द ऑडर ऑफ पाउलोवनिया फ्लॉवर्स' हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

➢ मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत महर्षी दयानंद कॉलेज विजेता ठरले.

➢ मुंबई विद्यापीठातर्फे संशोधन आणि पीएच.डी. प्रबंधासाठी दिला जाणारा अ.का. प्रियोळकर स्मृती पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कारासाठी संशोधक लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. अरूणा ढेरे तर सर्वोत्कृष्ट पीएच.डी. प्रबंधाच्या पारितोषिकासाठी डॉ. शीतल केतन पावसकर-भोसले यांची निवड झाली.

- ➢ विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील १२ महाविद्यालयांना उत्कृष्ट महाविद्यालयाचा दर्जा दिला आहे. त्यात कल्याणच्या बिर्ला महाविद्यालयाचा समावेश करण्यात आला आहे.

- ➢ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ इंद्रधनुष्य २०१४ युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाने उपविजेते पद पटकाविले.

- ➢ डॉ. प्रकाश आमटे यांना संस्थेचा सामाजिक न्यायासाठी दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'मदर तेरेसा आंतरराष्ट्रीय पुरस्कार' जाहीर झाला.

- ➢ दिलीप वेंगसरकर यांना सी.के.नायडू जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला.

- ➢ जेष्ठ पत्रकार आणि स्तंभलेखक विलास मुकादम यांना कॉ.गुलाबराव गणाचार्य यांच्या नावाचा उत्कृष्ट पत्रकारितेचा पुरस्कार जाहीर झाला.

- ➢ श्री. अरूण साधू यांना गदिमा पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच कवी गीतकार संदीप खरे यांना चैत्रबन पुरस्कार जाहीर झाला आहे आणि प्रसिध्द गायीका ऊर्मिला धनगर यांना विद्याप्रज्ञा पुरस्कार जाहीर झाला.

- ➢ बिरजू महाराज यांना कला शिखर या पुरस्काराने मा.राज्यपालांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

- ➢ डॉ.रवी कोल्हे आणि त्यांच्या पत्नी डॉ.स्मिता कोल्हे यांना आर.जी.जोशी फाऊंडेशनचा सामाजिक कृतज्ञता निधी पुरस्कार जाहीर झाला.

- ➢ भालचंद्र नेमाडे यांना समता पुरस्कार जाहीर करण्यात आला.

- ➢ पश्चिम विभागीय युवा महोत्सवामध्ये विजयाची पताका फडकावत मुंबई विद्यापीठाने सर्व स्पर्धामध्ये आपले निर्विवाद वर्चस्व कायम राखले.

- ➢ ख्यातनाम उद्योगपती रतन टाटा यांना सन २०१४ चा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला.

- ➢ राज्य शासनाच्या वतीने देण्यात येणारा 'पंडित भीमसेन जोशी 'पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रीय संगीत गायिका प्रभा अत्रे यांना जाहीर करण्यात आला.

- ➢ स्पंदन आर्ट संस्थेतर्फे मोहम्मद रफी जीवनगौरव पुरस्कार जेष्ठ गायिका आशा भोसले आणि जेष्ठ गायक सुरेश वाडकर यांना प्रदान करण्यात आला.

- ➢ भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना २०१५ वर्षासाठीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न देण्यात येणार आहे. त्याच बरोबरच बनारस हिंदू विद्यापीठाचे

संस्थापक आणि थोर स्वातंत्र्यसेनानीदिवंगत पंडित मदनमोहन मालवीय यांनाही मरणोत्तर याच पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

➢ मुंबई विद्यापीठाच्या मेरीट लिस्ट मध्ये दुसरे स्थान प्राप्त करणारी के.सी. महाविद्यालयाची कु. प्रीती दुबे या विद्यार्थीनीला मा. कुलगुरू डॉ. राजन वेळुकर आणि मा. प्र-कुलगुरू डॉ. नरेश चंद्र यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

➢ ग्वाल्हेर येथील प्रसिध्द राणी लक्ष्मी बाई राष्ट्रीय शारीरिक शिक्षण संस्थानात पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने सांघिक जेतेपद पटकावले.

➢ मुंबई विद्यापीठाच्या डिग्री ऑफ फार्मसी परीक्षेत सावर्डे येथील सह्याद्री शिक्षण संस्थेच्या गोविंदराव निकम कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये ज्योती पटेल हिने विद्यापीठाचे सुर्वणपदक पटकावले या बद्‌ल झालेल्या दीक्षांत समारंभात मा. कुलगुरू डॉ. राजन वेळुकर यांच्याहस्ते तिला गौरवण्यात आले.

➢ राष्ट्रपती भवनातर्फे प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला नागरी पद्‌म पुरस्काराची घोषणा करण्यात आली. भाजप नेते लालकृष्ण आडवाणी, ज्येष्ठ अभिनेते अभिताभ बच्चन, दिलीप कुमार, प्रकाशसिंह बादल, यांना पद्‌मभुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच श्री. विजय भटकर, स्वप्ना दासगुप्ता यांच्यासह २१ जणांना पद्‌म पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आणि चित्रपट दिग्दर्शक संजय लिला भन्साळी, कवी प्रसून जोशी यांच्यासह ७५ जणांना पद्‌मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

➢ वनराई पुणे आणि वनराई फाऊंडेशन, नागपूरच्या वतीने देण्यात येणारा 'स्व. डॉ. मोहन धारीया राष्ट्रनिर्माण पुरस्कार' ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना जाहीर झाला.

➢ प्रतिभासंपन्न लेखनशैलीने मराठी साहित्यात आपल्या स्वतंत्र 'पंथ' निर्माण करणारे ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक, कवी आणि इंग्रजीचे प्राध्यापक भालचंद्र नेमाडे यांना साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला.

➢ केंद्र सरकारच्या न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय रोल मॉडेल पुरस्कार के.जे.सोमय्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. कल्पना खराडे यांना मिळाला.

➢ असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीने आयोजित केलेल्या 'प्रवाह २०१५' या ३० व्या राष्ट्रीय युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाने विजयी पताका फडकावली आहे. सलग सहा वेळा मुंबई विद्यापीठाने विजय मिळवला.

➢ राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे देण्यात येणारा २०१४ वर्षासाठीचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार प्रा. द.मा.मिरासदार यांना जाहीर करण्यात आला.

➢ बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशनच्या वतीने माटुंगा येथील वेलिंगकर इन्सिटटयूटला 'बेस्ट मॅनेजमेंट इन्सिटटयूट ऑफ द इयर' पुरस्कार देऊन नुकतेच गौरवण्यात आले. यापूर्वी असोसिएशनने २०१० आणि २०१३ मध्ये वेलिंगकरला 'आऊटस्टॅडींग मॅनेजमेट इन्सिटटयूट ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित केले होते.

➢ मुंबई विद्यापीठाच्या संज्ञापन व पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ.सुंदर राजदीप यांचा 'पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडिया' च्या नवव्या जागतिक परिषदेत राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. तसेच डॉ. राजदिप यांना २०१५ साठी राष्ट्रीय स्तरावर 'बिझीनेस कम्युनिकेशन ट्रेनर' या विभागातून निवड होण्याचा बहुमान मिळाला आहे.

त्यानंतर अध्यक्षांनी कार्यक्रमपत्रिकेवरील बाब क्र. १ अधिसभेपुढे मंजूरीसाठी मांडली.

**बाब क्र. १ : दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजी झालेल्या अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संमत करणे.**

कार्यक्रम पत्रिकेवरील हा विषय सभेपुढे आला असता त्यावर सभेत सविस्तर चर्चा झाली. पेंढारकर महाविद्यालयावर काय कारवाई केली? मराठी भाषा दिन किती महाविद्यालयामध्ये साजरा केला जातो? एम.के.सी.एल बाबत काय कारवाई करण्यात आली? आयडॉलचे प्रवेश ऑनलाईन प्रमाणेच ऑफलाईन करण्याबाबत काय कार्यवाही केली आदी प्रश्नांचा खुलासा कार्यवाही अहवालात केलेला नाही तरी वरील प्रश्नांचा खुलासा करावा अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप यांनी केली.

पेंढारकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून वाढीव फी आकारली आहे. हा विषय गंभीर असून याबाबत विद्यापीठाने तात्काळ निर्णय घ्यावा. याबाबत विद्यापीठाने गठीत केलेल्या समितीने महाविद्यालयास कधी भेट दिली आणि समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने विद्यापीठाने नोटीस व्यतिरिक्त पेंढारकर महाविद्यालयावर कोणती कारवाई केली याचा खुलासा करावा अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी केली.

पेंढारकर महाविद्यालयावर अजुनही कारवाई न केल्यामुळे इतर महाविद्यालये देखील वाढीव शुल्क आकारत आहेत. विद्यापीठाने दिलेल्या नोटीसला/पत्रव्यवहाराला जर पेंढारकर महाविद्यालयाचे व्यवस्थापन जाब देत नसेल तर व्यवस्थापनातील सदस्यांना विद्यापीठामध्ये बोलवून त्यांच्याकडून खुलासा घ्यावा व महाविद्यालयावर तात्काळ दंडात्मक कारवाई करावी अशी सूचना श्री. प्रदिप सावंत यांनी व्यक्त केली.

पेंढारकर महाविद्यालयावर अजुनही कारवाई न केल्यामुळे विल्फ्रेड विधी महाविद्यालय, पनवेल, रू.१२,०००/- ऐवजी रू.३२,०००/- एवढी जादा फी आकारत आहे. तसेच अनेक बहुसंख्य महाविद्यालये अशाप्रकारे जादा फी आकारत आहेत त्यामुळे याचा विचार करून विद्यापीठाने तात्काळ कारवाई करावी अशी मागणी श्रीमती सुप्रिया करंडे यांनी केली.

पेंढारकर महाविद्यालयाबाबतच्या तक्रारी फक्त वाढीव फी बाबतच मर्यादित नसून तेथील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या समस्यांचा देखील त्यात अंतर्भाव आहे आणि या प्रश्नांची तीव्रता लक्षात घेऊन विद्यापीठाने समिती गठीत केली होती. परंतु गठीत केलेल्या समितीला तेथील व्यवस्थापनाने अपमानास्पद वागणुक दिली. तसेच विद्यापीठाच्या पत्रव्यवहारालाही उत्तर दिले नाही त्यामुळे या सर्व बाबी विचारात घेवून पेंढारकर महाविद्यालयावर विद्यापीठाने दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी सन्माननीय सदस्य डॉ. वसंत शेकडे यांनी केली.

सन्माननीय सदस्यांनी पेंढारकर महाविद्यालयाबाबत ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांचा विचार करून विद्यापीठाने महाविद्यालयावर ताबडतोब कारवाई करावी. तसेच कल्याण येथील पेपर फुटी प्रकरणाबाबत समिती गठीत करण्यात आली होती तरी त्या समितीचा अहवाल अजुनही प्राप्त झालेला नाही. त्यामुळे जे दोषी नाहीत ते कर्मचारी घरी आहेत व जे दोषी आहेत त्यांच्यावर काहीही कारवाई करण्यात आलेली नाही असा विरोधाभास आहे. त्यामुळे विद्यापीठाने याविषयी ठोस निर्णय घ्यावा अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप यांनी केली.

यु.जी.सी च्या नियमाप्रमाणे विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमानुसार महाविद्यालयाने शुल्क आकारणे आवश्यक आहे आणि या नियमांनुसार अंमलबजावणी न करणा-या महाविद्यालयांवर विद्यापीठ कारवाई करू शकते. याचा विचार करून तसेच विद्यापीठाने गठीत केलेल्या समितीला तेथील व्यवस्थापनाने जी अपमानास्पद वागणुक दिली या सर्वांचा विचार करून पेंढारकर महाविद्यालयावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. विजय पवार यांनी केली.

सेक्शन १४ नुसार कुलगुरू कोणत्याही महाविद्यालयाची चौकशी करू शकतात आणि त्या चौकशीला पूर्ण सहकार्य करणे हे प्रत्येक महाविद्यालयाचे कार्य आहे. तसेच याबाबत काही अडचणी वाटल्यास महाविद्यालयाने मा. कुलगुरूंना कळवावयाचे असते. तसेच चौकशी करावयाची की नाही याचे अधिकार मा. कुलगुरूंना आहेत. पण पेंढारकर महाविद्यालयाबाबत तसे झालेले नाही तसेच

पेंढारकर महाविद्यालयाने विद्यापीठाने गठीत केलेल्या समितीला सहकार्य केलेले नाही. त्यामुळे सेक्शन ९१ नुसार विद्यापीठ पेंढारकर महाविद्यालयावर कारवाई करू शकते. तसेच अशाप्रकारे काही महाविद्यालये वाढीव फी आकारत असतील तर त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे असे मत प्राचार्य राजाध्यक्ष यांनी मांडले.

पेंढारकर महाविद्यालयावर अजुनही कारवाई न केल्यामुळे गोखले एज्युकेशन, कॉप्रेसिव्ह महाविद्यालय चेंबूर, सोमैया महाविद्यालय तसेच अनेक व्यवस्थापन महाविद्यालये पी.एच.डी आणि प्रयोगशाळेच्या नावाखाली वाढीव शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारत आहेत. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून पूर्ण फी आकारली जाते आदी प्रश्न उपस्थित करून विद्यापीठामार्फत फी स्टक्चरबाबतचे परिपत्रक महाविद्यालये सुरू होण्या अगोदर पाठविण्यात यावे अशी सूचना श्री. संजय वैराळ यांनी केली.

विल्सन महाविद्यालयामध्ये चुकीच्या पध्दतीने निलंबित करण्यात आलेल्या शिक्षकांवर होत असलेला अन्याय विचारात घेऊन विद्यापीठ काहीच कारवाई करत नाही याबद्दल डॉ. (श्रीमती) संगिता गोडबोले, डॉ. अभय बांबोले आणि अनुराधा मजुमदार यांनी नाराजी व्यक्त करून ही एक अत्यंत खेदाची बाब आहे असे नमूद केले.

सन्माननीय सदस्यांनी विल्सन आणि पेंढारकर महाविद्यालयाबाबत अनेक मुद्दे मांडले. पेंढारकर, विल्सन आणि नेने महाविद्यालयावर विद्यापिठाने काय कारवाई केली याचा खुलासा करावा व समितीचा अहवाल सभागृहात सादर करावा अशी मागणी सन्माननीय सदस्य डॉ. वसंत शेकडे यांनी केली.

पेंढारकर महाविद्यालयाला भेट देऊन केलेली चौकशी व सादर केलेल्या अहवालाचा खुलासा तसेच महाविद्यालयाने समितीला दिलेल्या अपमानास्पद वागणुकीची माहिती पेंढारकर महाविद्यालयाबाबत गठीत करण्यात आलेल्या समितीच्या निमंत्रक या नात्याने श्रीमती अनुपमा सावंत यांनी सभागृहास दिली.

पेंढारकर महाविद्यालयाबाबत गठीत करण्यात आलेल्या समितीपैकी तीनच सदस्य हजर होते तसेच सदर महाविद्यालयाबाबत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या देखील अनेक तक्रारी आहेत. त्याबाबतीत विद्यापीठाने तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी श्रीमती माधवी निकम यांनी केली.

पेंढारकर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून जी जास्त फी घेतलेली आहे तसेच त्याचा खुलासा महाविद्यालय देत नाही तरीही विद्यापीठाने महाविद्यालयावर कारवाई का करू नये अशा प्रकारचे पत्र पाठविण्यात आले आहे. तसेच बोर्ड ऑफ स्टडीज आणि व्यवस्थापन परिषदेच्या माध्यमातून संबंधित महाविद्यालयावर कारवाई करण्याची प्रक्रिया चालू आहे व पुढील कारवाई योग्य पध्दतीने केली जाईल असा खुलासा मा. कुलगुरूंनी चर्चेस उत्तर देतांना केला.

तसेच पेंढारकर महाविद्यालयाबाबत विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण घोषवारा प्राचार्य राजपाल हांडे यांनी सभागृहास वाचून दाखविला व विद्यापीठाने काहीच कारवाई केली नाही हे सदस्यांचे म्हणणे खोडून काढले.

विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालय चालविले जाते आणि जर का कोणत्याही महाविद्यालयाने विद्यापीठाचे नियम पाळले नाहीत तर सदर महाविद्यालयावर विद्यापीठ सेक्शन ९१ आणि ९२ नुसार कारवाई करू शकते. पेंढारकर आणि विल्सन महाविद्यालयाबाबत ज्या काही तक्रारी प्राप्त असतील त्या अनुषंगाने आणि समितीने सादर केलेल्या अहवालाचा आधार घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ सेक्शन ९१ आणि ९२ मधील (८१) नुसार विद्यापीठ कारवाई करेल असा खुलासा मा. कुलगुरूंनी केला.

**बाब क्र. २ प्रश्नोत्तराचा तास –**

प्रश्न क्रमांक १ च्या अनुषंगाने प्रा. अंबादास मोहिते यांनी विद्यापीठ प्रशासनातर्फे २००० ते २००५, २००५ ते २०१० व २०१० ते २०१५ या कालखंडात कालखंड निहाय, विद्यापीठ विकास, भौतिक व शैक्षणिक सोयी–सुविधा, नाविन्यपूर्ण कार्यक्रम/उपक्रम आदींच्या अनुषंगाने प्रत्यक्षात काय अंमलबजावणी करण्यात आली? व विद्यापीठाच्या यासंदर्भातील पुढील काय योजना आहेत? असा प्रश्न उपस्थित केला. तसेच विचारलेल्या माहितीमधील विद्यापीठाच्या पुढील योजना काय आहेत हीच फक्त माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. इतर माहिती कालखंडनिहाय उपलब्ध करून दिलेली नाही. तसेच परिशिष्टामध्ये लिस्ट ऑफ प्रोग्रॅम दिलेला आहे. आपल्या विद्यापीठात यु.जी आणि पी.जी च्या महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विद्यापीठातील विद्यार्थी यांच्यामध्ये काय स्थित्यंतरे आली. तसेच रिसर्च सेंटर संबंधी माहिती देण्यात आलेली नाही. पी.एच.डी गाईडची सध्याची स्थिती काय आहे, ही माहिती देखील देण्यात आलेली नाही तरी सदर माहिती देण्यात यावी अशी मागणी केली.

सन्माननीय सदस्यांनी २००० ते २००५, २००५ ते २०१० व २०१० ते २०१५ या तीन कालखंडातील विचारलेल्या माहितीचे संकलन चालू आहे तसेच

माहिती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सध्या प्राथमिक स्वरूपात शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून आतापर्यंतची माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे असा खुलासा प्राचार्य डॉ. राजपाल हांडे यांनी करून सदर नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांचा घोषवारा सभागृहास वाचून दाखविला.

प्रश्नोत्तराच्या तासाची मर्यादा लक्षात घेता इतर महत्वाच्या प्रश्नांनाही वेळ मिळाला पाहिजे, छापील माहिती सभासदांना प्राप्त झाली असून प्रशासनाने ती वाचण्यात वेळ घालवू नये अशी सूचना श्री. सुधाकर तांबोळी, श्री. राजन कोळंबेकर, डॉ. वसंत शेकडे, आणि श्री. संजय वैराळ यांनी केली असता, सभासदांच्या भावना लक्षात घेऊन प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी सभागृहास महत्वाची माहिती थोडक्यात दिली, तसेच इतर कालखंडातील माहिती संकलीत झाल्यावर उपलब्ध करून देण्यात येईल असा खुलासा केला. तसेच राज्य शासनाकडून मुंबई विद्यापीठाला २६ एकराचा भूखंड देण्यात आलेला आहे असे देखील नमूद केले.

पी.एच.डी गाईडची यादी, सेंटरची यादी, पेट संदर्भातील माहिती, पी.एच.डी विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळण्यासंबंधीचे परिपत्रक, पी.एच.डी प्रबंध जमा करण्याच्या तारखा इत्यादी माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर टाकण्यात आलेली नाही असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. संजय वैराळ यांनी उपस्थित केला.

सदर माहिती पंधरा दिवसात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर टाकण्यात येईल असा खुलासा मा. कुलगुरूंनी केला.

महाविद्यालयामध्ये नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करताना विद्यापीठ महाविद्यालयाचे ॲकॅडेमिक ऑडिट करते का? असा प्रश्न सन्माननीय सदस्या श्रीमती अनुराधा मजुमदार यांनी उपस्थित केला.

विद्यापीठामार्फत तीन तज्ञांचा समावेश असणा-या समितीने पहिल्या प्रथम तीन महाविद्यालयांचे ॲकॅडेमिक ऑडिट केले आणि पुन्हा तीन महाविद्यालयांचे ॲकॅडेमिक ऑडिट करण्यात आलेले आहे. तसेच आणखी १२ नवीन महाविद्यालयांचे ॲकॅडमिक ऑडिट करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे. तसेच विद्यापीठामधील विभागांचे देखील ॲकॅडेमिक ऑडिट केले जाईल. तसेच ज्या महाविद्यालयांचा सी.जी.पी.ए २.५ आहे त्यांना प्रोत्साहन देणे, ज्या महाविद्यालयांची ग्रेड ए आहे अशा महाविद्यालयांना स्वायतत्ता देता येईल का? याबाबत विचार करणे हा ॲकॅडमिक ऑडिटचा उद्‌देश आहे. यासाठी क्वालिटी ॲश्युरन्स सेल, मुंबई विद्यापीठ असे सेंटर स्थापन करून एक संचालक नेमण्यात येईल असा खुलासा मा. प्र-कुलगुरूंनी केला.

प्रश्न क्र.१ च्या अनुषंगाने विचारण्यात आलेली २००१ ते २०१५ या कालखंडातील माहिती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सदर माहिती संकलित करण्याचे काम चालू आहे तसेच माहिती संकलित झाल्यानंतर सर्व सदस्यांना पुरविण्यात येईल असा खुलासा मा. कुलगुरूंनी केला.

तसेच मुंबई विद्यापीठामध्ये संशोधन चांगल्या प्रकारे होते की नाही? किंवा संशोधनाबाबतची परिस्थिती काय आहे असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला असता पर्ल्स स्किम साठी देशातील पाच ते सहा विद्यापीठांना संशोधनासाठी अनुदान देण्यात येते आणि त्यामध्ये मुंबई विद्यापीठाचा समावेश होऊन विद्यापीठाला वीस कोटी रूपयांचे अनुदान मिळालेले आहे यावरून मुंबई विद्यापीठामध्ये नक्कीच चांगले संशोधन होते अशी माहिती मा. कुलगुरूंनी सभागृहास दिली.

तसेच मुंबई विद्यापीठाला university with potential for excellance हे संशोधन आधारित अनुदान मिळाले आहे अशी माहिती प्राचार्य राजपाल हांडे यांनी देऊन विद्यापीठामध्ये उत्कृष्ट प्रकारे संशोधन होत आहे हे सिध्द केले.

<u>प्रश्‍ने क्र. २ –</u> विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांकरिता आचारसंहिता (Code of Conduct) तयार करण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा विचार आहे काय? असल्यास, ही संहिता कधीपर्यंत तयार होईल व त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येईल? असा प्रश्न प्रा. अंबादास मोहिते यांनी उपस्थित केला.

विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांकरिता आचारसंहिता (Code of Conduct) तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या बैठकीमधील ठरावानुसार विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांकरिता मार्गदर्शक तत्वे (code of conduct for Teachers) तयार करण्यासाठी श्री. संजय शेटे (निमंत्रक) यांच्यासहित ७ सभासदांची समिती गठीत केली असून समिती शिक्षकांकरिता आचारसंहिता (code of conduct for Teachers) तयार करीत आहे. तसेच समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेऊन त्यानुसार कार्यवाही केली जाईल असा खुलासा प्राचार्य डॉ. राजपाल हांडे यांनी केला.

मार्गदर्शक तत्वे (code of conduct for Teachers) तयार करण्याबाबत यु.जी. सी च्या किंवा सुप्रिम कोर्टाच्या काही गाईड लाईन आहेत का? टीचिंग प्रोफेशनच्या डिग्निटीच्या अनुषंगाने (code of conduct for Teachers) तयार करताना शिक्षक –विद्यार्थी रिलेशनशिप, शिक्षक –इन्स्टिट्युट रिलेशनशिप आदी

गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे असे मत मांडून शिक्षकांकरिता आचारसंहिता (code of conduct for Teachers) कधीपर्यंत तयार होईल आणि यामध्ये कोणकोणत्या मुद्यांचा समावेश करण्यात येणार आहे याचा खुलासा करावा अशी मागणी प्रा. अंबादास मोहिते यांनी केली.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २००८ च्या गॅझेटमध्ये जी मार्गदर्शक तत्वे (code of conduct for Teachers) देण्यात आली आहेत त्यांचा अंतर्भाव करावा व त्यामध्ये काही सूचना असतील तर त्यांचा देखील विचार करून समावेश करावा असे मत सन्माननीय सदस्य डॉ. बाळकृष्ण भोसले यांनी मांडले.

ज्याप्रकारे मार्गदर्शक तत्वे (code of conduct for Teachers) महाविद्यालयातील शिक्षकांकरिता आहे तशाच प्रकारे विद्यापीठातील शिक्षकांकरिता मार्गदर्शक तत्वे (code of conduct for Teachers) असणे आवश्यक आहे अशी मागणी सन्माननीय सदस्य प्राचार्य मुरलीधर कु-हाडे यांनी केली.

मार्गदर्शक तत्वे (code of conduct for Teachers) प्राचार्यांना देखील लागू असेल का अशी विचारणा सन्माननीय सदस्या श्रीमती अनुपमा सावंत यांनी केली.

चर्चेस उत्तर देतांना, मार्गदर्शक तत्वे (code of conduct for Teachers) हे शिक्षकांच्या परिभाषेमध्ये ज्यांचा समावेश होतो त्या सर्वांना लागू असेल. तसेच व्यवस्थापनाबाबतीत देखील देशातील संस्थांमध्ये मार्गदर्शक तत्वे आहेत त्यांचा विचार केला जाईल असा खुलासा मा. कुलगुरू यांनी केला.

यानंतर सन्मानीय सदस्य श्री. महादेव जगताप यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला, सदर स्थगन प्रस्तावास सन्मानीय सदस्य श्री. राजन कोळंबेकर यांनी अनुमोदन दिले.

**"मुंबई विद्यापीठात चाललेल्या अनागोंदी कारभाराबाबत उदा. परिक्षेतील गोंधळ, प्रशासनातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या नेमणुका, १८३ अनुदानित महाविद्यालयातील नियमित प्राचार्यांच्या नेमणुका व ५५७ कायमस्वरूपी विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नेमणुका, विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची होणारी हेळसांड व इतर अनंत बाबतीत विद्यापीठात निर्माण झालेल्या गोंधळामुळे हे सभागृह १० मिनिटे तहकुब करण्यात यावे."**

विद्यार्थ्यांचे निकाल वेळेत लागत नाहीत, एम.एम.एम च्या रिपीटर विद्यार्थ्यांची परीक्षा वर्षातून एकदाच घेतली जाते व निकाल लावण्याकरिता दीड वर्षे वाट पहावी लागते. तसेच जे विद्यार्थी पास आहेत त्यांना नापास दाखविण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी कमी वेळ दिला जातो, एम.एस्सी च्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण झाला नसतानाही त्यांची परीक्षा घेण्यात आली. फोटो कॉपी वेळेत उपलब्ध करून दिली जात नाही, पी.एच.डी व पी.जी च्या सर्व विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप दिली जात नाही, पी.जी चे जे मागासवर्गीय विद्यार्थी आहेत त्यांच्यकडून पूर्ण फी आकारली जाते, प्राचार्य पदासाठी नेमणूक करतांना ज्या शिक्षकांची पी.एच.डी झालेली नाही अशा शिक्षकांची मुलाखत समितीमध्ये नेमणुक करणे चुकीचे आहे, दूर शिक्षण केंद्रामध्ये प्रोफेसर कम संचालक हे पद रद्द करून संचालक हे पद निर्माण केल्यामुळे सदर संचालक पी.एचडी साठी १० विद्यार्थी घेऊ शकत नाहीत. तसेच दूर शिक्षण केंद्रामधील उपसंचालक दीड वर्षापासून रजेवर असताना देखील त्यांना कोणत्याही प्रकारची समज न देता हजर करून घेतलेले आहे आणि विना टेंडर उपसंचालकांनी ४० लाख रूपयांचा खर्च केला. प्राध्यापकांची नेमणुक करताना मराठी विभागात १२ वर्षे काम करणा-या प्राध्यापिकेला प्राधान्य न देता इतर लोकांना प्राधान्य देण्यात आले. आदी प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप यांनी स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने उपस्थित केले.

परीक्षा विभागातील २२ निकाल रखडलेले आहेत. रिव्हॅल्युएशन देखील वेळेत होत नाही. तरी मा. कुलगुरूंनी नैतिक जबाबदारी स्विकारून श्वेतपत्रिका काढावी. तसेच मा. कुलगुरूंच्या न्यायालयीन कामकाजाकरिता केलेल्या १२.५ लाख रूपयांच्या खर्चाबाबत खुलासा करावा. अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. प्रदिप सावंत यांनी केली.

एम.एस.सी च्या पार्टली बाय पेपर्स आणि पार्टली बाय रिसर्च विद्यार्थ्यांच्या मार्कशिटवर पास क्लास देण्यात आलेला आहे. शासनाच्या निर्देशानुसार संबंधित विद्यार्थ्यांना ग्रेड देणे आवश्यक आहे. एम.एस.सी च्या विद्यार्थ्यांनी दोन वर्षांचे संशोधन करणे आवश्यक आहे आणि त्यानंतर थेसिस सबमिट करणे आवश्यक आहे त्यासाठी १६ पॉईंटस् ठेवण्यात आले आहेत, त्यानंर रिसर्च सबमिट करणे आवश्यक आहे आणि व्हायवाला देखील मार्क देणे आवश्यक आहे पण मुंबई विद्यापीठातील कोणत्याही विद्यार्थ्यांना थेसिस किंवा व्हायवा वर अधारित मार्क देण्यात आलेले नाहीत तसेच विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या करिअरशी खेळलेले आहे. एम. एम.एस च्या विद्यार्थ्यांच्या डिग्री सर्टीफिकेटवर देखील ग्रेड देण्यात आलेली नाही त्यामुळे एम.एम.एस च्या विद्यार्थ्यांना बाहेर जॉबला जाताना अडचणी येतात.

एम.एम.एस च्या विद्यार्थ्यांना २०१४ ला देण्यात आलेल्या मार्कशिटवर Under Graduate चे ग्रेड दिलेले आहेत. अशा प्रकारच्या अडचणी असतानासुध्दा या प्रश्नांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. इंजिनिअरिंगच्या परिक्षेमध्ये विद्यार्थ्यांकडून पैसे घेवून पास केले जाते हे निदर्शनास येऊन देखील विद्यापीठाने त्याबाबत काहीही कार्यवाही केलेली नाही. आदी प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. संजय वैराळ यांनी चर्चेत सहभागी होतांना उपस्थित केले.

बी.एस.सी आयटी, एम.एम.एस यासारखे जे प्रोफेशनल कोर्स मुंबई विद्यापीठामध्ये आहेत त्यातील कोणत्याही प्राध्यापकांना ॲप्रुव्हल दिले जात नाही तसेच त्यांना **examinarship** दिली जाते त्यामुळे त्यांच्याकडून समाधानकारक काम होत नाही तसेच जे शिक्षक पात्र नाहीत किंवा ज्यांना पेपर तपासणीचा किंवा शिकविण्याचा कमी अनुभव आहे अशांना विद्यापीठामध्ये काम दिले जाते त्यामुळे गोंधळ निर्माण होतो. म्हणुन जसे मॉडरेटरला १० वर्षांचा अनुभव असल्याशिवाय मॉडरेटरशिप दिली जात नाही त्याचप्रकारचे नियम **examinarship** देताना लावल्यास गोंधळ निर्माण होणार नाही. समाजकल्याण विभागाने ऑनलाईन स्कॉलरशिप फॉर्ममधून बी.एस.सी आयटी आणि एम.एम.एस हा कॉलम काढून टाकलेला आहे. पण पुणे विद्यापीठामध्ये बी.एस.सी आयटी या विषयाचे नाव बी.सी.ए, आणि एम.एम.एस या विषयाचे नाव एम.सी.ए असे असून तेथील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देण्यात आलेली आहे. नावातील बदलामुळे मुंबई विद्यापीठातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपला मुकावे लागले असल्यामुळे मुंबई विद्यापीठाने सदर अभ्यासक्रमांच्या नावामध्ये बदल करावा. तसेच पाचव्या आणि सहाव्या सेमिस्टरसाठी जो पासवर्ड दिला जातो तो को-ऑर्डिनेटर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांना दिला जातो. पण हा पासवर्ड सेक्युअर राहण्यासाठी फक्त प्राचार्यांनाच पासवर्ड देण्यात यावा. तसेच पासवर्ड देतांना मोबाईल नंबरचे व्हेरिफिकेशन होणे आवश्यक आहे. आदी सूचना सन्माननीय सदस्य डॉ. विजय पवार यांनी केल्या.

मुंबई विद्यापीठ किती खेळ आयोजित करते याची माहिती देण्यात यावी व स्पोर्ट समितीची बैठक दर दोन महिन्यांतून घेण्यात यावी. तसेच विद्यापीठामध्ये जे Sport Expert आहेत त्यांचा वापर कोठेही करून घेतला जात नाही. तसेच संचालक, केंद्रे यांच्या मनमानी कारभाराला आळा घालावा आदी मुद्दे श्री. राजन कोळंबेकर यांनी उपस्थित केले.

परीक्षा विभागातील गोंधळाला एम.के.सी.एल जबाबदार असल्यामुळे त्यांच्यावर काय कारवाई केली याचा खुलासा करावा व दूर शिक्षण केंद्रामधील

प्रथम वर्षाची प्रवेश परीक्षा ऑनलाईन ऐवजी ऑफलाईन करावी अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत झोरे यांनी केली.

चर्चेत पुढे सहभागी होतांना, मुंबई विद्यापीठाला १५० वर्षांचा उज्वल इतिहास आहे पण विद्यापीठातील परीक्षा भवनामध्ये विद्यार्थ्यांसाठी वॉटर कुलर तसेच स्वच्छतागृह उपलब्ध नाहीत, विद्यार्थ्यांना मार्कशिट मिळण्यास खुप विलंब होतो, विद्यापीठाच्या प्रेसमध्ये कर्मचारी नसतात, रिव्हॅल्युएशनचे निकाल वेळेत लावले जात नाहीत, दुर शिक्षण केंद्रामध्ये परीक्षांचे वेळापत्रक लावण्यात येत नाही तसेच पुस्तके देखील उपलब्ध करून दिली जात नाहीत. सुरक्षा रक्षकांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांनादेखील २२ टायगर सिक्युरिटींची भरती करण्यात आली, पेंढारकर, विल्सन महाविद्यालयांबाबत अनेक प्रश्न असतानादेखील त्याबाबत काहीही कारवाई करण्यात आली नाही आदी प्रश्नांबाबत नाराजी व्यक्त करून याबाबत मा. कुलगुरूंनी लवकरात लवकर उपाययोजना आखून ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे असे मत सन्माननीय सदस्या श्रीमती सुप्रिया करंडे यांनी मांडले.

महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना परीक्षेचे किती मानधन मिळते याची माहिती द्यावी व मिळत असलेले मानधन अत्यंत कमी असून त्यात वाढ करावी तसेच गेल्या वर्षीचे मानधन अजुन मिळालेले नाही ते देण्यात यावे अशी मागणी श्री दिलीप पवार यांनी केली.

डी.एस.डब्ल्यु विभागामध्ये जेव्हा विद्यार्थी ॲप्रुव्हलसाठी टॉपिक फॉरवर्ड करायला येतात तेव्हा ॲप्रुव्हलवर विभाग प्रमुखाची सही दोन-दोन महिने होत नाही आणि परिणामी विद्यार्थी मुंबई विद्यापीठ सोडून जातात त्यामुळे विभागप्रमुखांना सही करण्यासाठी काही कालमर्यादा ठरवून द्यावी अशी सूचना श्रीमती निलिमा भुर्के यांनी केली.

चर्चेत सहभाग घेतांना, महिला कर्मचा-यांनी ७.०० वाजेपर्यंत कार्यालयात थांबावे तसेच विद्यापीठाच्या कामकाजाकरिता वेळ झाल्यास सदर महिला कर्मचा-यांना स्टेशन पर्यंत सोडण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला होता पण त्याची अंमलबजावणी होते की नाही? मुंबई विद्यापीठामध्ये २० महिला सुरक्षा रक्षक असणे आवश्यक आहे पण त्यांची संख्या कमी आहे, तसेच महिला सुरक्षा रक्षकांची ड्युटी फोर्ट, कलिना, मरीन लाईन येथे वारंवार बदलली जाते. महिला तक्रार निवारण केंद्रामध्ये किती तक्रारी नोंदविल्या आणि किती तक्रारी निकाली काढल्या याचा खुलासा करावा. स्पोर्ट कॅम्पस्ची जागा शारीरिक शिक्षण विभागासाठी, विद्यार्थ्यांना स्पोर्टसाठी की कल्चरल ॲक्टीव्हीटीसाठी दिलेली आहे हे

स्पष्ट करावे. विद्यार्थ्यांकडून ज्यासाठी फी आकारण्यात येते त्या सोयीसुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. स्वाईन फ्लूबाबत जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयांना पत्र पाठविण्यात यावे अशाप्रकारचे निवेदन देण्याता आले होते पण त्यावर कार्यवाही करण्यात आली नाही. विद्यापीठाच्या हेल्थ सेंटरमध्ये पूर्णवेळ डॉक्टरचे पद अजूनदेखील नेमण्यात आलेले नाही. आदी प्रश्न उपस्थित करून सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी नाराजी व्यक्त केली.

स्पोर्ट संचालक केंद्रे यांची नेमणुक कधी झाली आणि या पदासाठी काही कालमर्यादा आहे की नाही? परीक्षा विभागातील व्हेरिफिकेशन विभागामध्ये स्कॅम्प चालू आहे, तसेच व्हेरिफिकेशनसाठी ६०० रूपये घेऊन देखील खूप विलंब होतो, इतर ठिकाणी व्हेरिफिकेशन २५० रूपयांमध्ये केले जाते, व्हेरिफिकेशन विभागामध्ये होणारा गैरप्रकार निदर्शनास आल्यामुळे तेथील अधिका-यांची बदली केली होती पण पुन्हा त्याच अधिका-याला पदोन्नती देऊन त्याच विभागामध्ये रूजू करण्यात आले आहे, त्यामुळे तेथे पुन्हा गैरप्रकार होत आहेत व त्याचा त्रास विद्यार्थ्यांना होत आहे. तरी व्हेरिफिकेशन बाबत सखोल विचार करून उपाययोजना करण्यात यावी आदी मुद्दे सन्माननीय सदस्य श्री प्रदिप सावंत यांनी चर्चेस सहभागी होतांना उपस्थित केले.

इतर विद्यापीठामध्ये व्हेरिफिकेशनसाठी २०० ते ३०० रूपये घेतले जातात पण मुंबई विद्यापीठामध्ये व्हेरिफिकेशनसाठी बी.ए, पी.एचडी, बी.कॉम इत्यांदीसाठी वेगवेगळया दरानुसार ४०००/-, ५०००/-, ६०००/- असे पैसे घेतले जातात तसेच त्याची पावतीही दिली जाते असा आरोप करून श्री. बिंदूप्रकाश मिश्रा यांनी नाराजी व्यक्त केली.

मार्कशिट मिळवून देण्यासाठी देखील विद्यार्थ्यांकडून पैसे घेतले जातात असा आरोप श्रीमती सुप्रिया करंडे यांनी केला.

व्हेरिफिकेशनसाठी चार ते पाच हजार रूपये घेतल्याची पावती दिल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल असे आश्वासन मा. प्र-कुलगुरूंनी दिले. तसेच मार्कशिट व रिव्हॅल्युएशन विद्यार्थ्यांना वेळेत मिळावेत म्हणून उपाययोजना कार्यान्वित करण्याची प्रक्रिया चालू असल्याबाबतचा खुलासा मा. प्र-कुलगुरूंनी चर्चेस उत्तर देतांना केला.

वुमन डेव्हलपमेंट सेल मध्ये जे कार्यक्रम होतात त्या कार्यक्रमांना सिनेट सदस्यांना आमंत्रण दिले जात नाही असे श्रीमती निलिमा भुर्के यांनी निदर्शनास आणून दिले.

२०१३ ला एम.फिल च्या विद्यार्थ्यांनी थेसिस जमा केले आहेत परंतु आजतागायत त्या विद्यार्थ्यांना डिग्री मिळालेली नाही. तसेच एका विद्यार्थीनीने थेसिस जमा केल्यानंतर डिग्री तर मिळाली नाहीच पण त्या विद्यार्थीनीचा थेसिसच गहाळ झाला. तसेच एम.फिल, पी.एचडी चे प्रपोजल जमा करण्याकरिता कालमर्यादा असली पाहिजेत. आदी प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. संजय वैराळ यांनी उपस्थित केले.

फोर्ट कॅम्पस् व्यतिरिक्त कलिना कॅम्पस्, रत्नागिरी उपकेंद्र, कल्याण उपकेंद्र आणि इतर ठिकाणी ज्या जमिनी आहेत त्या जमिनींचे योग्य व्यवस्थापन करण्याच्यादृष्टीने त्या ठिकाणी चांगले कुंपण करण्याचा एक अत्यंत चांगला निर्णय मुंबई विद्यापीठाने घेतला आहे. तरी देखील बाहेरील संस्थांना आपल्या विद्यापीठाच्या जागा देऊन जे लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे त्याबाबत प्रश्न उपस्थित करून या जमिनींचा प्रश्न सोडविल्यास विद्यापीठाची अनेक कोटी रूपयांची संपत्ती संवर्धीत होईल. डब्ल्यु. आर.आय.सी आणि आय.सी.एस.एस.आर या ठिकाणी विद्यापीठाच्या जागेत जी गेस्ट हाऊस बांधलेली आहेत त्यापासून विद्यापीठाला काहीही महसुल मिळत नाही. त्यामुळे मिळणा-या महसुलापैकी ५० टक्के महसुल विद्यापीठाला मिळायला पाहिजे आणि ५० टक्के वाटा जर देणार नसतील तर विद्यापीठाने बांधकामासाठी आलेला खर्च त्या संस्थांना देऊन सदर इमारती आपल्या ताब्यात घ्याव्यात आदि सूचना श्री. संजय शेटे यांनी चर्चेत सहभागी होतांना केल्या.

तसेच अल्केश दिनेश मोदी संस्था असणारी जागा ही विद्यापीठाची असून विद्यापीठाने ती जागा आपल्या ताब्यात घ्यावी. आयटा संस्थेला सात एकर जागा देण्यात आलेली आहे पण विद्यापीठातील व्यक्तींना त्या ठिकाणी प्रवेश मिळत नाही. तेव्हा या जागेबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन ही जागा विद्यापीठाने ताब्यात घ्यावी. आदी मुद्दे उपस्थित करून याबाबत विद्यापीठाच्या मागण्या मान्य होण्यासाठी अंबादास माहिते यांच्या नेतृत्वाखाली शासनाशी लढा द्यावा. तसेच मा. कुलगुरूंनी याबाबत खुलासा करावा अशी मागणी केली.

चर्चेत पुढे सहभागी होत आयटा या संस्थेने महानगरपालिकेचा कर भरलेला नसून ती रक्कम आता अनेक कोटी रूपये झाली असून आयटाने हा कर विद्यापीठ भरेल असे महानगरपालिकेला कळविले आहे. तरी सदर कर

विद्यापीठाने न भरता आयटा संस्थेवर कारवाई करावी अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. प्रदिप सावंत यांनी केली.

चर्चेस उत्तर देतांना आयटा संदर्भात कायदेशीर सल्ला घेऊन पंधरा ते वीस दिवसामध्ये आयटा या संस्थेला कायदेशीर नोटीस देण्यात येईल असा खुलासा मा. कुलगुरूंनी केला.

सध्या सर्व निकाल जाहीर झाले असून आतापर्यंत एकही निकाल प्रलंबित नाही. आर्किटेक्चरची बी.ओ.इ च्या ठरावानुसार रिज्युई घेण्यात आलेली आहे. तसेच दर पंधरा दिवसांनी परीक्षा भवनामध्ये ओपन डे घेण्यात येणार आहे. यापुढे घेण्यात येणा-या परीक्षांसंदर्भात सर्व अधिष्ठाते बी.ओ.ई चे सर्व सदस्य आणि प्र-कुलगुरू या सर्वांची बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. एम.एससी मॅथ्स आणि रिव्हॅल्युएशन संदर्भात उपाययोजना करण्यात येतील. तसेच एम.एससी च्या सर्टीफिकेटवर ग्रेड देणे आवश्यक आहे त्याप्रमाणे त्यावर कार्यवाही केली जाईल. स्पोर्टस्मध्ये ज्या काही सुधारणा करणे आवश्यक आहे त्या सुधारणा केल्या जातील. WRIC, ICSSR, आयटा आणि अल्केश दिनेश मोदी या संस्थांबाबत जी काही कार्यवाही करणे शक्य असेल त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. तसेच परीक्षा भवनात वॉटर कुलरची व्यवस्था करण्यात येईल असा खुलासा मा. प्र-कुलगुरूंनी केला.

प्रत्येक दोन ते अडीच महिन्यातून आर.आर.सी च्या बैठका होत असतात तसेच सध्याचा बॅकलॉग झिरो आहे. जे लोक पात्र आहेत त्यांची गाईडची संख्या वाढलेली आहे, विद्यार्थ्यांची संख्या वाढलेली आहे आणि विद्यापीठामध्ये संशोधनही चांगल्या प्रकारे होत आहे. तसेच आर.आर.सी मध्ये जर manipulation होत असल्यास सन्माननीय सदस्यांनी ते लक्षात आणून दिल्यास त्यावर तात्काळ कार्यवाही केली जाईल असा खुलासा सन्माननीय सदस्य डॉ. जोगदंड यांनी केला.

विधी आणि फार्मसी या विभागांची आर.आर.सी बैठक दीड वर्षापासून झालेली नाही असा मुद्दा सन्माननीय सदस्य डॉ. विजय पवार आणि श्री. महादेव जगताप यांनी निदर्शनास आणून दिला.

तसेच लायब्ररी विभागामध्ये गाईड कमी असतांनादेखील तसेच काही विद्यार्थ्यांना शिक्षक पदाचा अनुभव असताना देखील गाईडशिप नाकारली गेली. तसेच गाईडशिपसाठी शिक्षक पदाचा अनुभव असणे आवश्यक आहे की नाही याचा खुलासा करावा अशी मागणी सन्माननीय सदस्या डॉ. संगिता गोडबोले यांनी केली.

विद्यापीठाचा जो ऑर्डिनन्स आहे त्यामधील सर्व तरतुदी या लायब्ररी विभागालादेखील लागु आहेत असा खुलासा मा. कुलगुरूंनी उत्तर देताना केला.

शिक्षक पदाचा अनुभव असताना देखील गाईडशिप नाकारली असल्यास त्याची चौकशी करून कार्यवाही केली जाईल असा खुलासा सन्माननीय सदस्य डॉ. जोगदंड यांनी केला.

चर्चा पुढे नेत विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागामध्ये व स्पोर्ट विभागामध्ये फारच गोंधळ आहे त्यामुळे हे दोन विभाग सुधारण्याच्या दृष्टीने उपाययोजना होणे आवश्यक आहे असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. राजन कोळंबीकर व श्री. प्रदिप सावंत यांनी उपस्थित केला.

खेळ हे एक प्रोफेशन आहे त्यामुळे आपण त्याकडे त्या दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. आणि म्हणुन एप्रिल महिन्यात ॲडव्हायजरी कमिटी बोलवून येत्या पाच वर्षात विद्यापीठामध्ये चांगले खेळाडू कसे तयार होतील तसेच ज्या काही अडचणी असतील त्या दूर करून त्याबाबत उपाययोजना आखून माफा ट्रॉफी विद्यापीठाला कशी मिळविता येईल याबाबत आराखडा तयार करण्यात येईल व विद्यापीठ याबाबत ठोस निर्णय घेईल. तसेच खेळाडुंसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वेळ लागतो तसेच विद्यापीठाने कलिना कॅपसमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ज्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत त्यांची माहिती सभागृहास दिली. तसेच केंद्र शासनाच्या स्पोर्टस् विभागाकडून मुंबई विद्यापीठाला सहा कोटी रूपयांचे एक इनडोअर स्टेडियमसाठी परवानगी मिळालेली आहे व त्यासाठी अनुदान देखील आलेले आहे आणि त्याचे बांधकाम या उन्हाळ्यात चालू होईल अशी माहिती मा. कुलगुरूंनी सभागृहास दिली.

तसेच जर कोणी जास्त पैसे घेऊन व्हेरिफिकेश अथवा मार्कशिट देत असल्यास अशा प्रकारची तक्रार आल्यास त्यावर तात्काळ कार्यवाही करावी. तसेच यावर उपाययोजना म्हणून व्हेरिफिकेश अथवा मार्कशिट यांचे डिमॅटिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे व ही दोन्ही महत्वाची सर्टीफिकेटस् विद्यापीठाच्या पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच ज्या कोणत्या employee ला व्हेरिफिकेशन करावयाचे असेल त्याला संबंधित विद्यार्थ्याच्या परवानगीने ते ऑनलाईन करता येईल असा खुलासा मा. कुलगुरूंनी चर्चेस उत्तर देतांना केला.

महिला कर्मचा-यांनी सायंकाळी ६.३० ते ७.०० पर्यंत कार्यालयात कमाकरिता थांबावे आणि जर का विद्यापीठाच्या कामास्तव त्यांना वेळ झाल्यास महिला कर्मचा-यांना स्टेशन पर्यंत किंवा घरी सोडण्याची जबाबदारी विद्यापीठाने

घ्यावी असे पत्र सर्व विभागांना पाठविण्यात आले आहे. तसेच कलिना येथील हेल्थ सेंटरसाठी एक पूर्णवेळ डॉक्टर पदाची जाहिरात १५ एप्रिल २०१५ पर्यंत देण्यात येईल असा खुलासा मा. प्र-कुलगुरूंनी केला.

एम.एससी विद्यार्थ्यांची टर्म पूर्ण झालेली नसतानाही त्या विद्यार्थ्यांची परीक्षा जाहीर करण्यात आली आहे तरी परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात अशी मागणी श्री. महादेव जगताप यांनी केली.

ज्या विषयाच्या विद्यार्थ्यांची तक्रार आहे व ज्या तक्रारीमध्ये तथ्य आहे अशा विषयाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात येतील असे आश्वासन मा. प्र-कुलगुरू यांनी दिले.

ऐरोली येथील मेहता महाविद्यालयातील ऑडीट विषयाच्या २० विद्यार्थ्यांचे इंटरनल मार्क महाविद्यालयाने न कळविल्यामुळे सदर विद्यार्थ्यांचा निकाल दीड वर्षापासून लागलेला नाही असा प्रश्न श्री. महादेव जगताप यांनी उपस्थित केला.

याबाबत सात दिवसामध्ये चौकशी करून तात्काळ कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन मा. कुलगुरूंनी दिले.

दूर शिक्षण संस्थेमध्ये शिकणारे विद्यार्थी/विद्यार्थीनी एका विषयात नापास झाल्यास पुन्हा सर्व विषयाचे पेपर द्यावे लागतात तरी याबाबत योग्य तो विचार व्हावा अशी सूचना श्री. महादेव जागताप यांनी केली.

चर्चेत सहभागी होतांना सध्याचे सुरक्षा कर्मचारी दहा ते बारा वर्षे विद्यापीठामध्ये काम करत असतानासुध्दा त्यांना रू.७,०००/- पगार दिला जातो, त्यांना सेवेत कायम करण्यात आलेले नाही तसेच प्रकरण न्यायप्रविष्ठ असतानादेखील नवीन टायगर सुरक्षा कर्मचा-यांची भरती केली आणि त्यांना रू. १४,०००/- पगार दिला जातो अशी तफावत का? अशी विचारणा श्रीमती सुप्रिया करंडे यांनी केली.

चर्चेस उत्तर देतांना महाराष्ट्र शासनाच्या २००५ च्या शासन निर्णयानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक केलेल्या कोणत्याही कर्मचा-याला कायम करता येत नाही. तसेच स्वच्छक, माळी, सुरक्षारक्षक ही पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावीत. तसेच जे कर्मचारी न्यायालयात गेलेले आहेत त्यांना continue करा असा आदेश न्यायालयाने दिला आहे व त्याप्रमाणे विद्यापीठाने कार्यवाही केलेली आहे. सदर कर्मचा-यांना विद्यापीठ कायमस्वरूपी करू शकत नसल्यामुळे एजन्सीमार्फत या कर्मचा-यांना कायम करण्यास विद्यापीठ तयार आहे. तसेच यापुढे विद्यापीठाला

आवश्यक असणारी सुरक्षारक्षक, माळी, स्वच्छक ही पदे सर्व प्राधिकरणांनी निर्णय घेऊन नियुक्त केलेल्या एजन्सीमार्फत भरण्यात येतील असा खुलासा मा. कुलसचिव यांनी केला.

सुरक्षा रक्षकांबाबतचा प्रश्न हा फार जुना असुन सध्या जे सुरक्षारक्षक दहा ते बारा वर्षे विद्यापीठामध्ये काम करत आहेत ते आपले काम प्रामाणिकपणे, जबाबदारीने व तत्परतेने करत आहेत. दहा ते बारा वर्षापासून काम करणा-या कर्मचा-यांना सात हजार रूपये पगार दिला जातो आणि टायगर सुरक्षारक्षकांना पंधरा हजार पगार दिला जातो असा भेदभाव असता कामा नये. तसेच याबाबत विद्यापीठाने वेळोवेळी समित्या नेमल्या पण त्या समित्यांच्या अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या कर्मचा-यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून विद्यापीठाने याबाबत तात्काळ उपाययोजना करावी असे मत प्राचार्य राजाध्यक्ष यांनी प्रकट केले.

सुरक्षारक्षकांबाबत योग्य पध्दतीने निर्णय घेणे आवश्यक असल्याने याबाबत ४ एप्रिल, २०१५ रोजी बैठक घेण्यात येईल व तसे पत्र सदस्यांना पाठविण्यात येईल असा खुलासा मा. कुलगुरूंनी केला.

पुणे व जळगाव विद्यापीठामध्ये पी.एचडी विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के गुणांची अट आहे पण मुंबई विद्यापीठामध्ये हीच अट ५५ टक्के लावण्यात आली आहे तसेच पेट ही परीक्षा देखील द्यावी लागते असा प्रश्न श्री. महादेव जगताप यांनी उपस्थित केला.

याबाबत सहानुभूतीपूर्वक योग्य तो निर्णय घेण्यात येईल असा खुलासा मा. कुलगुरूंनी केला.

वरील खुलाशाअंती सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप यांनी आपला स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

यानंतर सन्मानीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी त्यांचा एकत्रित स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला, सदर स्थगन प्रस्तावास सन्मानीय सदस्य श्री. गणेश चव्हाण यांनी अनुमोदन दिले.

**मुंबई विद्यापीठ कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा नियंत्रक, बी. सी.यु.डी डायरेक्टर त्याचप्रमाणे फॅकल्टी अधिष्ठाता (डिन) ही प्रमुख अधिकार असलेली ऑफिसर पोस्ट आहेत. सर्व ऑफिसर पोस्ट प्रत्येकाला ऑफीसची जागा व भेटण्याची वेळ ठरविल्याप्रमाणे असते.**

सगळ्यांना ऑफिसेस दिलेली आहेत परंतु प्रत्येक फॅकल्टीचे अधिष्ठाता (डिन) यांना भेटण्याची जागा व वेळ कुठेही समाविष्ठ नाही. जर सिनेट मेंबर किंवा विद्यार्थी यांना भेटायचे असेल तर त्यांनी कुठे भेटायचे? त्याचबरोबर अधिष्ठाता यांना वेतन किंवा मानधन दिले जाते का? आणि ते कशाप्रकारे असते? तरी ही सभा पंधरा मिनिटे तहकुब करावी.

मुंबई विद्यापीठामधील परिक्षा भवन येथील सी.सी.एफ/फोटोकॉफी/ पुनर्मुल्यांकन/मार्कीशिटस्/डिग्री सर्टीफिकेटस्/(डुप्लिकेट) रिझल्ट उशीरा लागणे/ रिझल्ट (निकाल) जरी लागला तरी २/३ महिने छापील मार्कीशिट न मिळणे. इत्यादिं मुळे विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो यासाठी सभागृह १५ मिनिटे तहकुब करावे.

**मुंबई विद्यापीठातील अधिकारी वा कर्मचारी यांच्या बदली संदर्भात २०१४-१५ दरम्यान किती अधिकारी व कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात आल्या? तसेच बदली झालेले अधिकारी वा कर्मचारी नवीन ठिकाणी रूजु झाले का? किंवा कोणाच्या दबावाखाली या आदेशाने बदल्या थांबवल्या याची सविस्तर माहिती सभागृहाला द्यावी यासाठी सभागृह १० मिनिटे तहकुब करावे.**

विद्यापीठ अधिनियमाप्रमाणे कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, बी.सी.यु.डी डायरेक्टर यांच्याप्रमाणेच जे काही अधिकारी असतील त्यांची माहिती व फोटो संकेतस्थळावर उपलब्ध असणे आवश्यक आहे पण इतर अधिका-यांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध नाही. तरी सदर माहिती लवकरात लवकर संकेतस्थळावर देण्यात यावी. अधिष्ठाता या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या काय आहेत? त्यांना वेतन मिळते की मानधन मिळते व ते कशाप्रकारे मिळते याचा खुलासा करावा. तसेच अधिष्ठाता यांना संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणुन तसेच अधिष्ठाता म्हणुन देखील काम पहावे लागते त्यामुळे संभ्रम निर्माण होतो त्यामुळे त्यांच्यावर कामाच ताण वाढतो. तासगावकर महाविद्यालयाच्या हलगर्जीपणामुळे अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. २०१४-१५ या वर्षामध्ये किती अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात आल्या तसेच बदली केलेले कर्मचारी/अधिकारी नवीन ठिकाणी रूजू झाले का? झाले नसल्यास कोणाच्या दबावाने या बदल्या थांबविण्यात आल्या? तसेच अधिकारी/कर्मचारी यांची ३ ते ५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर संबंधित डेस्कवरून बदली करण्यात येते पण पंधरा ते वीस वर्षे एकाच डेस्कवर काम करणा-या कर्मचारी/अधिकारी यांची बदली का

करण्यात आली नाही? याचा खुलासा करावा. विद्यार्थ्यांना गुणपत्रिका, हॉल तिकीट, राखीव निकालाच्या गुणपत्रिका, रिव्हॅल्युएशनचे निकाल उशिरा मिळतात व त्यामुळे विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. मुंबई विद्यापीठातील सी. सी.एफ विभागामध्ये गुणपत्रिका छापण्यासाठी प्रिंटर व कर्मचारी देखील कमी आहेत. निकाल जाहीर केल्यानंतर त्याचे गॅझेट संबंधित महाविद्यालयाला पाठविण्यात येते आणि त्यानंतर दोन महिन्यांनी विद्यार्थ्यांना गुणपत्रिका मिळते. पण इतर विद्यापीठांच्या धर्तीवर नवीन तंत्राज्ञानाचा वापर करून निकाल जाहीर करतानाच निकालाची प्रत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. परीक्षा भवनामध्ये सर्टीफिकेटसाठी विद्यार्थ्यांना वेठीस धरून त्यांच्याकडे पैशाची मागणी केली जाते तरी संबंधित अशा कर्मचा-यांवर कारवाई होणे गरजेचे आहे आदी मुद्दे श्री. सुधाकर तांबोळी यांनी स्थगन प्रतावाच्या अनुषंगाने मांडले. तसेच परीक्षा नियंत्रक यांनी केलेल्या उत्तम कामाबद्दल डॉ. दिनेश भोंडे यांचे अभिनंदन केले.

अधिष्ठाता यांना महाविद्यालयाचे प्रोफेसर, महाविद्यालयाचे प्राचार्य, अधिष्ठाता अशाप्रकारे सर्व जबाबदा-या असतात. त्यांना शासनाकडून वेतन मिळते. तसेच विविध विद्याशाखांवरील कामाचा ताण कमी व्हावा म्हणुन हे पद निर्माण करण्यात आले आहे तसेच त्यांना स्वतंत्र केबीन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे असा खुलासा मा. प्र-कुलगुरूंनी केला.

विद्यार्थ्यांचे परीक्षांचे, रिव्हॅल्युएशनचे निकाल वेळेत लागत नाहीत व त्याचा नाहक त्रास विद्यार्थ्यांना सहन करावा लागतो व विद्यार्थ्यांचे नुकसान होते. अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या दबावाखाली केल्या जातात. रत्नागिरी उपकेंद्रामधील अधिकारी/कर्मचारी यांच्या अनेक वर्षांपासून बदल्या केलेल्या नाहीत तसेच रत्नागिरी हे ग्रामीण भागात येते पण तेथील कर्मचा-यांना मुंबईच्या धर्तीवर महागाई भत्ता दिला जातो आदी प्रश्न श्री. गणेश चव्हाण यांनी उपस्थित केले.

विद्यापीठातील व महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांना देण्यात येणारे मानधन एक ते दीड वर्ष झाले तरी मिळालेले नाही तरी ते देण्यात यावे तसेच मानधनामध्ये वाढ होणे आवश्यक आहे अशी सूचना श्री. दिलीप पवार यांनी केली.

विविध विद्याशाखांवरील ताण कमी व्हावा व तात्काळ निर्णय व्हावेत याकरिता अधिष्ठाता हे पद निर्माण करण्यात आले पण त्यांना स्वतंत्र केबीन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच अधिसभा सदस्यांना देखील कलिना

कॅपसमध्ये जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. परीक्षा भवनातील अधिकारी/कर्मचारी यांच्या अनेक वर्षांपासून बदल्या झालेल्या नाहीत तरी त्यांच्या बदल्या होणे आवश्यक आहे आदी सूचना श्री. संजय वैराळ यांनी उपस्थित केल्या.

अधिष्ठाता या पदाची भूमिका व कर्तव्ये काय आहेत याची माहिती अधिनियमामध्ये नमूद केलेली आहे. तसेच अधिष्ठातांना काहीही भत्ता, मानधन नसून सहा महिन्यातून रूपये तीन ते चार हजार टेलिफोन बील म्हणुन दिले जातात. तसेच सांगोपाग विचार करता मुंबई विद्यापीठाचा दर्जा उत्तम असल्याचे आढळुन येईल असे डॉ. जोगदंड यांनी नमूद केले.

१९९४ च्या अधिनियमान्वये अधिष्ठातांवर फार मोठी जबाबदारी दिलेली आहे. तसेच विद्यापीठ अधिष्ठाता याच पदावर असलेल्या व्यक्ती महाविद्यालयामध्ये प्राध्यापक असतात त्यामुळे प्राचार्यांच्या निर्देशानुसार त्यांना महाविद्यालयामध्ये थांबावे लागते व परिणामी अधिष्ठाता हे आपल्या जबाबदा-या पार पाडू शकत नाहीत आणि म्हणून अधिष्ठाता हे पद पूर्ण वेळ असावे असा ठराव या अधिसभेत मंजूर करावा व तो शासनाकडे पाठवावा असे मत डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी व्यक्त केले.

मुरलीधर चांदेकर यांनी मांडल्याप्रमाणे अधिष्ठाता हे पद पूर्णवेळ निर्माण करण्यात यावे व तसा ठराव शासनाकडे पाठवावा असे मत मांडून वरील ठरावाला प्रा. अंबादास मोहिते यांनी अनुमोदन दिले.

अधिष्ठाता हे एका ठिकाणी राहून काम करू शकत नाहीत, तर त्यांना संबंधित ठिकाणी जाऊन काम करावे लागते. अधिष्ठाता हे एक्झिक्युटीव्ह ऑफीसर नसून अॅकॅडेमिक ऑफिसर आहे तसेच मा. कुलगुरूंच्या निर्देशनुसार ते काम करत असतात. बैठकीमध्ये निर्णय घेऊन संबंधित विभागाला पाठविणे हे अधिष्ठाता यांचे काम असून त्यापुढील काम हे संबंधित विभाग करत असतो. तसेच अधिष्ठाता हे पद पूर्णवेळ असावे का? याबाबत सखोल विचार करून निर्णय घेण्यात यावा असे मत डॉ. राजाध्यक्ष यांनी मांडले.

अधिष्ठाता हे पद पूर्णवेळ असावे का? हा विषय कार्यक्रम पत्रिकेवर नसल्यामुळे याबाबत या अधिसभेमध्ये ठराव करू नये तसेच ठराव करावयाचा झाल्यास त्याबाबत सखोल अभ्यास करूनच एकमताने ठराव करावा असे डॉ. वसंत शेकडे यांनी नमूद केले व सदर ठरावास विरोध दर्शवला.

तासगावकर महाविद्यालयातील कर्मचा-यांचे पगार नऊ-नऊ महिने झाले नाहीत म्हणून तेथील कर्मचा-यांनी संप केला त्याबाबत मा. कुलगुरूंनी बैठक

देखील घेतली पण यामध्ये अधिष्ठाता यांनी आपली भूमिका पार पाडली नाही असे श्री. दिलीप पवार यांनी नमूद केले.

जर एखाद्या वेळी विद्यापीठामध्ये अधिष्ठाता यांना बैठकीसाठी बोलवण्यात आले आणि त्याचवेळी जर महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी बैठक घेतली असल्यास अधिष्ठाता यांना विद्यापीठामध्ये बैठकीसाठी जाण्याची परवानगी दिली पाहिजे असा नियम नाही आणि त्यामुळे प्राचार्यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयात थांबावे लागते आणि काही वेळा अधिष्ठाता यांना बैठकीला हजर राहता येत नाही. या सर्व कायद्याच्या मर्यादा आहेत आणि त्यामध्ये अधिष्ठाता भरडला जातो आणि विद्यार्थ्यांबाबतचे निर्णय अधिष्ठाता यांना घ्यावयाचे असल्यामुळे परिणामी विद्यार्थी देखील भरडला जातो आणि म्हणुन यातून मार्ग काढण्याच्यादृष्टीने चर्चा होणे आवश्यक आहे असे मत डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी मांडले.

चर्चेअंती अधिष्ठाता हे पद पूर्णविळ असावे असा ठराव करून तो शासनाकडे पाठविण्यास काही हरकत नाही असे प्राचार्य डॉ. राजपाल हांडे यांनी नमूद केले.

अधिष्ठाता हे एल.आय.सी, आर.आर.सी, ॲकॅडेमिक कौन्सिलचे मेंबर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्यदेखील असतात आणि काही वेळा प्राधिकरणाच्या महत्वाच्या बैठका असतात त्यावेळी अधिष्ठाता हे विद्यापीठाने घेतलेल्या बैठकीला हजर राहू शकत नाहीत. आणि म्हणुन आठवड्यातील कोणतेही तीन दिवस ठरवून त्या दिवशी अधिष्ठातांच्या बैठका घेण्यात याव्यात तसेच इतर अधिका-यांप्रमाणे सर्व अधिष्ठाता यांना मिळुन एक Secretariat नेमण्यात आले आणि त्यांच्यामार्फत बैठका ठरविण्यात आल्यास होणारा गोंधळ कमी होईल असे मत डॉ. पेजावर यांनी मांडले.

अधिष्ठाता हे पद पूणवेळ असावे की नसावे याबाबत प्रत्येकाची मते वेगवेगळी असू शकतात तसेच याबाबत ठराव करण्याचा विषय या सदनाचा आहे पण या विषयाचे विषयांतर झाल्याने याबाबतची चर्चा थांबविण्यात यावी असा खुलासा मा. कुलगुरूंनी केला.

परीक्षा भवनमधील सर्व समस्यांबाबत दिनांक २७/३/२०१५ रोजी बैठक घेण्यात येईल व सर्व समस्या सोडविण्याच्यादृष्टीने उपाययोजना आखण्यात येतील. तसेच अधिष्ठाता, फॅकल्टी ऑफ सायन्स आणि फॅकल्टी ऑफ टेक्नॉलॉजी तसेच संबंधित सदस्य यांची बैठक दिनांक ६/४/२०१५ रोजी १०.३० ते १२.३० वाजता घेण्यात येईल. ॲकॅडेमिक कॅलेंडर सर्व महाविद्यालयांना पाठविण्यात येईल. सी.सी.एफ मध्ये आणखी प्रिंटरची आवश्यकता असल्यास प्रिंटर उपलब्ध करून

देण्यात येईल. प्रत्येक पंधरा दिवसांनी एक ओपन डे घेण्यात येईल. सी.ए.पी मानधन शिक्षकांना वेळेत देण्याची व्यवस्था करण्यात येईल. रिव्हॅल्युएशनचे निकाल वेळेत लावण्यात येतील आदी आश्वासने मा. प्र-कुलगुरूंनी दिली.

सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करून ज्या अधिका-यांची सेवा तीने ते पाच वर्षे झालेली आहे तसेच काही बाबतीत प्रशासनिक अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाच्या सोईच्यादृष्टीने मे महिन्यापर्यंत अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्यांबाबत नियोजन करण्यात येईल असे आश्वासन मा. कुलसचिव यांनी दिले.

प्रत्येक फॅकल्टीवाईज ओपन डे घेण्यात यावा अशी सूचना श्री. सुधाकर तांबोळी यांनी केली. तसेच २०१४ मध्ये किती अधिका-यांच्या बदल्या करण्यात आल्या. तसेच विद्यार्थ्यांना घरपोच डिग्री देण्यासाठी किती विद्यार्थ्यांकडून रू.५०/- घेतले होते आणि किती विद्यार्थ्यांना पैसे परत केले याची माहिती सभागृहास द्यावी अशी मागणी श्री. सुधाकर तांबोळी यांनी केली.

अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्यांबाबतची सर्व माहिती दोन-तीन दिवसामध्ये संकलित करून पुरविण्यात येईल असा खुलासा मा. कुलसचिव यांनी केला.

बदलीचा विषय प्रशासकीय आहे आणि २०१४ मध्ये किती बदल्या झाल्या याची माहिती सन्माननीय सदस्यांना दोन दिवसांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच शासनाच्या निर्देशाप्रमाणे अपवादात्मक परिस्थिती वगळून ज्या अधिकारी/कर्मचा-यांची सेवा तीन/पाच वर्षे झालेली आहेत त्यांची शासकीय नियमानुसार बदली करण्यात यावी. तसेच रत्नागिरी उपकेंद्र येथील कर्मचा-यांना किती महागाई भत्ता दिला जातो याची वित्त अधिकारी यांनी तपासणी करावी आणि शासनाच्या नियमाप्रमाणे तेथील कर्मचारी/अधिकारी यांना महागाई भत्ता द्यावा असे निर्देश मा.कुलगुरू यांनी प्रशासनास दिले.

मा.कुलगुरूंच्या खुलाशाअंती सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी आपला स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

यानंतर सन्मानीय सदस्य श्री. संजय वैराळ यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला, सदर स्थगन प्रस्तावास सन्मानीय सदस्या श्रीमती सुप्रिया करंडे यांनी अनुमोदन दिले.

**मुंबई विद्यापीठ अंतर्गत येणा-या कॉलेजेस मधील प्राचार्य, शिक्षक आणि मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियमबाह्य भरती केल्याबद्दल तसेच विद्यापीठ आणि त्यांच्या अंतर्गत येणारे कॉलेजेस यांचे ॲकॅडमिक ऑडीट न केल्याबद्दल तसेच मुंबई विद्यापीठाची जमीन, फर्निचर व इतर साहित्य व इमारतीचे ऑडीट न केल्यामुळे तसेच मागासवर्गीय विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकरिता सरकारमान्य व यु.जी.सी तर्फे देत असलेल्या योजनांचे उल्लंघन केल्याबद्दल तसेच मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत येणा-या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा न पुरविल्याबद्दल मी मुंबई विद्यापीठाचा निषेध व्यक्त करीत आहे याकरिता सभा अर्धा तास तहकुब करावी.**

विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भरती प्रक्रिया राबवताना नियमबाह्य नियुक्त्या करण्यात आल्या. ब-याच नियुक्त्यांमध्ये पात्रताधारक उमेदवारांना डावलण्यात आले. सहायक कुलसचिव, उपकुलसचिव या पदावर नियुक्ती दिलेल्या व्यक्तींची पोलीस चौकशी केलेली नाही. मुंबई विद्यापीठांतर्गत येणा-या ३० प्राचार्यांच्या नेमणुका नियमबाह्य केलेल्या आहेत. तसेच ए.पी.आय मॅनेज केले जातात. प्राध्यापकांची भरती नियमबाह्य झालेली आहे. विद्यापीठ आणि विद्यापीठांतर्गत येणा-या महाविद्यालयांचे ॲकॅडमिक ऑडीट केलेले नाही. विद्यापीठातील अनेक विभागांना जागा नसताना मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरातील कोट्यावधी रकमेच्या जागेवर झालेले अतिक्रमण, जे.पी नाईक भवनागामील विद्यापीठाच्या जागेत वाढत्या वस्त्यांकडून होणारे अतिक्रमण तसेच हयात हॉटेल, आर्मी हॉस्टेल, पोलीस खात्याला दिलेली जागा, राजीव गांधी डिपार्टमेंटच्या इमारतींपैकी सकाळ फाऊंडेशन, आयटा. बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, आय.सी.एस.एस.आर, अल्केश दिनेश मोदी, टेनिस कोर्ट आदी जागा विद्यापीठाने परत घेणे आवश्यक आहे. हिंदु कॉलनीमध्ये विद्यापीठाला बंगला दिलेला आहे त्याची सद्यस्थिती काय आहे? तसेच जमिनीचे ऑडीट होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाने विद्यापीठातील स्पेशल सेल हा विभाग अपंग केला आहे. त्यांना कोणत्याही प्रकारचे ट्रेनिंग देण्यात येत नाही, मॉनिटरींग कमिटी नाही. महाविद्यालयांत ॲडमिशन कशा प्रकारे चालतात त्यांचा डेटा विद्यापीठाकडे नाही. किती ॲडमिशन एस.सी किती ॲडमिशन एस.टी.ची झाली याचे रेकॉर्ड विद्यापीठाकडे नाही. राजीव गांधी फेलोशिप मागासवर्गीय विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नाही, स्कॉलरशिप, फेलोशिप प्रत्येक विद्यार्थ्याला मिळण्याच्या दृष्टीने सदर प्रक्रिया सुरळीतपने राबविणे आवश्यक आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुस्तके, बुक बॅक योजना, तसेच इतर सवलतींचा लाभ दिला जात नाही. बुक बॅकेमध्ये कबर्ड् नाहीत.

विद्यार्थ्यांना रेमेडियल कोचिंग मिळत नाही, रेमेडियल कोचिंगखाली कम्युनिटी मायनॉरीटीसाठी असलेल्या स्किम्स राबविल्या जात नाहीत. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना इंटरनेट, पुस्तके, मैदान, इनडोअर आणि आऊटडोअर गेम आदी सुविधा पुरविणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार गांर्भियाने करणे गरजेचे आहे, आदी मुद्दे श्री. संजय वैराळ यांनी स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने उपस्थित केले.

पी.एच.डी नसताना देखील प्राचार्यांना ॲप्रुव्हल दिलेले आहे, ए.पी.आय मॅनेज केले जातात ही फार भयावह बाब आहे. विद्यापीठाच्या अती महत्वाच्या जागेवर अतिक्रमण होत आहे तरी ती जागा ताब्यात घेण्याच्या दृष्टीने तात्काळ उपाययोजना करावी व यावर प्रशासनाने खुलासा द्यावा अशी मागणी डॉ. अभय बांबोले यांनी केली.

चर्चेत सहभागी होतांना, ज्या व्यक्तींची पी.एचडी झालेली नाही अशा व्यक्तींना प्राचार्य पदासाठी मुलाखत घेणा–या निवड समितीमध्ये स्थान देणे चुकीचे आहे. तसेच साठे महाविद्यालयाबाबत अनेक तक्रारी तसेच गुन्हा दाखल झाला असतांना अशा महाविद्यालयाला उत्कृष्ठ महाविद्यालय म्हणुन पुरस्कार देणे चुकीचे आहे असे प्रतिपादन डॉ. विजय पवार, श्री. गणेश चव्हाण आणि डॉ. अभय बांबोले यांनी केले.

चर्चेस उत्तर देतांना साठे महाविद्यालयाबाबत कागदपत्रांची तपासणी करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मा. कुलगुरूंनी दिले.

मा. कुलगुरूंनी आपल्या कारकिर्दीत अनेक उत्तम योजना आखल्या व उत्तम त–हेने राबविल्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचे व गंभीर प्रश्न उपस्थित केले असून त्यावर उपाययोजना करण्याच्यादृष्टीने तसेच विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, कर्मचा–यांना बेसिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठामध्ये कॅपस डेव्हलपमेंट सेल स्थापन करावा अशी पृच्छा डॉ. बाळकृष्ण भोसले यांनी व्यक्त केली.

बुक बॅकेची योजना आर्टस् विद्याशाखेमध्ये राबविण्यात आली आहे व त्यामार्फत सध्या ग्रंथालयात मराठी, हिंदी, इंग्रजीची एकुणे १८५३ पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच या योजनेसाठी यु.जी.सी कडून प्रत्येक वर्षी एक लाख रूपये मिळतात आणि त्यामार्फत सुसज्ज असे ग्रंथालय निर्माण करण्यात आले आहे असा खुलासा डॉ. जोगदंड यांनी केला.

मा. कुलगुरूंनी आपल्या कारकिर्दीत अनेक उत्तम योजना आखल्या व उत्तम त-हेने राबविल्याबद्दल मा. कुलगुरू व त्यांच्या सहका-यांचे आभार व्यक्त केले. तसेच सन्माननीय सदस्य पोडतिडकीने प्रश्न मांडत असतात त्याचा गांभिर्याने विचार होणे आवश्यक आहे. ज्या-त्या प्रश्नांच्या अनुषंगाने गठीत केलेल्या समितीचे म्हणणे विचारात घेऊन सदर प्रश्न सोडविले जाणे आवश्यक आहे. विद्यापीठातील कॅन्टीनचे टेंडरिंग होणे आवश्यक आहे आदी मुद्दे श्री. सुधाकर तांबोळी यांनी चर्चेत सहभागी होतांना उपस्थित केले.

प्राचार्य पदाची जाहिरात देताना ए.पी.आय व ४०० गुणांचा समावेश करण्यात यावा. तसेच ज्या वेळी एखाद्या प्रश्नाच्या अनुषंगाने गठीत केलेल्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने सदर तक्रारीमध्ये तथ्य असल्यास संबंधित महाविद्यालयावर कारवाई केली जावी आणि तथ्य नसल्यास तसे संबंधित महाविद्यालयाला कळविले जावे अशा सूचना प्राचार्य रोकडे यांनी केल्या.

तक्रारींच्या अनुषंगाने ज्या समित्या गठीत केल्या जातात त्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने विद्यापीठाने काय कार्यवाही केली याची माहिती सदर समितीच्या सदस्यांना कळविण्यात यावी. तसेच घरपोच डिग्री सर्टीफिकेटसाठी किती विद्यार्थ्यांकडून पैसे घेतले तसेच डिग्री न दिल्यामुळे किती विद्यार्थ्यांचे पैसे परत केले. स्वाईन फ्लूच्या जनजागृतीबाबत महाविद्यालयांना परिपत्रक पाठविण्यात आले का? याची माहिती सभागृहास द्यावी अशी मागणी श्री. सुधाकर तांबोळी यांनी केली.

गेल्या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेंटरसाठी पाच लाख रूपयांची तरतूद केली होती तसेच महाराष्ट्र शासनाकडून २१ लाख रूपयांचे अनुदान मिळाले होते पण त्याचा वापर अजुनही झालेला नाही तरी विद्यार्थ्यांच्या हितासाठी या पैशांचा वापर होणे आवश्यक आहे. तसेच बुक बॅंक योजनेसाठी २०१४-१५ ची बैठक अजुन घेण्यात न आल्याने महाविद्यालयांना बुक बॅंकेसाठी पैसे पाठविण्याचे प्रस्ताव तसेच थांबलेले आहेत. रेमेडियल कोर्सेस यु.जी.सी च्या गाईड लाईन प्रमाणे चालविणे आवश्यक आहे व त्यांचे मॉनेटरिंग होणे आवश्यक आहे आदी प्रश्न श्री. संजय वैराळ यांनी उपस्थित केले.

सन्माननीय सदस्यांनी अनेक महत्वाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांमधील काही प्रश्न व्यापक स्वरूपाचे, काही सहज सुटण्यासारखे तरी काही प्रश्न योग्य त्या स्तरावर सुटण्यासारखे आहेत. तसेच काही प्रश्नांसाठी पॉलीसी डिसिजन आवश्यक आहे. आणि म्हणुन संजय वैराळ यांच्या स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने जे प्रश्न असतील ते सोडवण्याच्या दृष्टीने व उपाययोजना आखण्यासाठी ९ मार्च, २०१५ रोजी मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली सन्माननीय सदस्यांची बैठक

घेण्यात येईल असे आश्वासन मा. कुलगुरूंनी दिले असता श्री. संजय वैराळ यांनी आपला स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

यानंतर सन्मानीय सदस्य डॉ. वसंत शेकडे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला, सदर स्थगन प्रस्तावास सन्मानीय सदस्या डॉ. माधवी निकम यांनी अनुमोदन दिले.

**मुंबई विद्यापीठातील नोकरशाहीचा मनमानी कारभार, एकुण नियमांचे उल्लंघन आणि काही विभागांचे गोंधळ (संदिग्धता) निर्माण करणारे कामकाज, ढासळणारे व्यवस्थापन, शिक्षकी व्यवसायाची प्रतिष्ठा मलिन करत असून त्याचे विपरित परिणाम शैक्षणिक प्रशासकीय व परीक्षांच्या कामकाजावर दिसून येत आहे. त्याचे परिणाम संलग्नित महाविद्यालयांवर दिसून येत आहे. त्याची खोल चिंता व्यक्त करण्यासाठी सदर सभा दहा मिनिटांसाठी स्थगित करण्यात यावी.**

पेन महाविद्यालयाने शासनाची परवानगी नसताना भूगोल विषय सुरू केला तसेच दंड भरावा लागणार म्हणून हा विषय बंद करण्यात आला आणि त्यानंतर प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर न्यायालयाने काहीही निर्णय दिलेला नसताना विषय बंद करण्यात आला. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे परिस्थिती जैसे थे ठेवणे आवश्यक होते परंतु तसे झाले नाही. तसेच सदर विषयांबाबत विद्यापीठाने चौकशी समिती नेमली पण तेथील व्यवस्थापनाने समितीला अपमानास्पद वागणुक दिली. विद्यापीठाच्या नियमांचे उल्लंघन करणा-या पेन महाविद्यालयाच्या प्राचार्यांवर कारवाई करावी. तसेच तेथील प्राध्यापकांवर होणारा अन्याय थांबविणे आवश्यक आहे. आणि म्हणून समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने पेन महाविद्यालयावर तात्काळ कारवाई करावी. विल्सन महाविद्यालयाबाबत देखील अनेक तक्रारी असून चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने अजूनदेखील कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे पेंढारकर महाविद्यालयाबाबत अनेक तक्रारी असून तेथील कर्मचा-यांवर अन्याय होत असून याबाबत तात्काळ निर्णय होणे अत्यंत आवश्यक आहे. मुंबई विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील प्राचार्य/शिक्षक पदावर काम करणा-या कंत्राटी कर्मचा-यांना अत्यल्प पगार दिला जातो. विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील शिक्षकांची पदोन्नती रखडलेली आहे त्यासंबंधात विद्यापीठाने परिपत्रक काढावे. तसेच ३० एप्रिल पर्यंत कॅस चे प्रोगॅम पूर्ण केले जावेत अशाप्रकारचे परिपत्रक काढावे. शासन नियमानुसार प्राध्यापकांना पंधरा रजा मंजूर आहेत तरी देखील शिक्षकांना रजा मिळत नाहीत

त्यामुळे विद्यापीठाने रजांबाबतचे परिपत्रक महाविद्यालयांना पाठवावे. काही शिक्षकांना परीक्षेच्या कामकाजातून वगळण्यात आल्यामुळे तक्रार निवारण समितीकडे तक्रार केली होती पण तक्रार निवारण समितीच्या निर्णयावर कार्यवाही झालेली नाही. शिक्षकांकडून पेपर तपसणीचे काम वेळेवर पूर्ण केले जाते पण विद्यापीठाकडून निकाल लावण्यास विलंब होतो. तसेच वृत्तपत्रांमधून मा. कुलगुरू पदाविषयी ज्या बातम्या आल्या त्यांचा निषेध नोंदविला व विद्यापीठाबाबतच्या बातम्या एखाद्या अधिका-यामार्फत वृत्तपत्रांना दिल्या जाणे आवश्यक आहे. चिंचणी महाविद्यालयातील एका प्राध्यापकाला पूर्ण वेतन मिळत नाही तसेच याबाबत तक्रार निवारण कक्षाने निर्णय देऊन देखील त्यावर कार्यवाही केली जात नाही. संशोधनाबाबत देखील काही अडचणी असून त्या दूर कराव्यात. तसेच संशोधन प्रबंध ॲप्रुव्हड् करण्याबाबत ज्या समित्या निवडल्या जातात त्या तटस्थ असणे आवश्यक आहे. सुरक्षा रक्षकांना विद्यापीठ सेवेमध्ये कायम करण्याच्यादृष्टीने विचार होणे व त्यांना न्याय देणे आवश्यक आहे. मुंबई विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण विभाग, जगन्नाथ शंकरशेठ वसतीगृह, दूर शिक्षण विभागाचे वसतीगृह, शिक्षक भवन आदी वसतीगृहांची दुरावस्था झाली असून विद्यापीठाच्या कामाकरिता शिक्षक, प्राचार्य आणि इतर व्यक्तींची राहण्याची योग्य व्यवस्था होत नाही. विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामध्ये पूर्ण वेळ डॉक्टर असणे आवश्यक आहे. शिक्षक कर्मचा-यांना न्याय देण्याच्यादृष्टीने तासगावकर महाविद्यालयातील ज्या काही समस्या/तक्रारी आहेत त्या तात्काळ सोडविणे आवश्यक आहे. तसेच तक्रार निवारण समितीमधील ज्या काही तक्रारी शिल्लक आहेत त्या ३० एप्रिल, २०१५ पर्यंत निकाली काढण्यात याव्यात आदी मुद्दे डॉ. वसंत शेकडे यांनी स्थगन प्रस्तावाच्या चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित केले.

चर्चेत पुढे सहभागी होतांना, शिक्षक/कर्मचा-यांना वेळेत न्याय देण्याच्या दृष्टीने तक्रार निवारण समितीमध्ये कॅस बाबत, नेट सेट ॲफेक्टेड शिक्षकांच्या बाबत, ए.पी.आय बाबत ज्या केसेसे पेंडींग आहेत त्या ३० एप्रिल २०१५ पर्यंत निकाली काढण्यात याव्यात. सहसंचालक अधिसभेला उपस्थित असणे आवश्यक आहे. थेसिस सेक्शनमध्ये सहायक कुलसचिव, उपकुलसचिव ही पदे रिक्त आहेत. रिझवी महाविद्यालयातील शिक्षक स्टॅटिस्टिक्स विषय शिकवतात आणि पी.एचडी इकॉनॉमिक्स या विषयात केलेली आहे, तसेच कणकवली महाविद्यालयातील शिक्षक समाजशास्त्र विषय शिकवतात व पी.एचडी रूरल डेव्हलपमेंट या विषयात केलेली आहे आणि याबाबतचे समकक्षता प्रमाणपत्र आर्टस् विभागाच्या अधिष्ठातांनी दिलेले आहे. तर समकक्षता प्रमाणपत्र देण्याचे अधिकार अधिष्ठातांना आहेत का? जर असल्यास त्याचा फायदा इतर शिक्षकांना देखील मिळावा. पी.एचडी व्हेरिफिकेशन बाबत विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून त्याबाबत तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक

आहे. विल्सन, पेंढारकर, पेण, चिंचणी, बु-हाणी महाविद्यालयांबाबत ज्या तक्रारी आहेत त्यावर तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठाने बु-हानी महाविद्यालयासाठी Administrator नेमावा. कंत्राटी शिक्षकांना अत्यल्प पगार दिला जातो व त्यांचे शोषण केले जाते. आदी प्रश्न डॉ. माधवी निकम यांनी चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित केले.

चिंचणी महाविद्यालयातील कंत्राटी शिक्षकाला गेल्या १९ वर्षांपासून रू.८,०००/- पगार दिला जातो, तसेच पे फिक्सेशन केलेले नाही, इन्क्रीमेंट दिलेली नाही याबाबत खुलासा करावा. परीक्षांच्या आणि रिव्हॅल्युएशनच्या निकालामध्ये ताळमेळ नाही आहे. तसेच विद्यापीठाने परीक्षा आणि रिव्हॅल्युएशनचे निकाल वेळत लावल्यास विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने ती एक अत्यंत महत्वाची बाब ठरेल आदी मुद्दे डॉ. बिंदुप्रकाश मिश्रा यांनी चर्चेत सहभागी होतांना उपस्थित केले.

पी.एचडी चे व्हेरिफिकेशन, व्हायवा तसेच रिव्हॅल्युएशन आणि परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर होत नाहीत इत्यादी प्रश्न श्री. ए.पी.पांडे यांनी उपस्थित केले.

पेंढारकर महाविद्यालयाबाबत नेमलेल्या समितीने सादर केलेला अहवाल सभागृहात सादर करावा, तसेच शिक्षक/प्राध्यापक/प्राचार्य यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता किती समित्या नेमण्यात आल्या, शारीरिक शिक्षण विभाग आणि अल्केश दिनेश मोदी संस्थेतील गोंधळाबाबत नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली? दूर शिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र उपलब्ध होत नाही. विद्यार्थ्यांच्या डिग्री सर्टीफिकेटवर मागील परीक्षा नियंत्रकांचे नाव आहे तरी त्यामध्ये बदल करून सध्याच्या परीक्षा नियंत्रकांचे नाव घेण्यात यावे आदी प्रश्न श्री. सुधाकर तांबोळी यांनी उपस्थित केले.

नेट/सेट बाधित शिक्षकांना मा. न्यायालयाच्या आदेशानुसार करिअर ॲडव्हान्समेंटचे फायदे अदा करण्यासाठी विद्यापीठाच्या कॉनकॉल विभागाने परिपत्रकाद्वारे फक्त याचिकाकर्त्यांची माहिती महाविद्यालयाकडून मागवली आहे पण ज्या शिक्षकांचा अंतर्भाव याचिकाकर्त्यांमध्ये नाही अशा शिक्षकांची देखील माहिती मागवून त्यांना देखील सदर लाभ देण्यात यावा अशी विनंती प्राचार्य मगरे यांनी केली.

तासगावकर महाविद्यालयाबाब नेमलेल्या समितीच्या सदस्या या नात्याने श्रीमती डॉ. आरती प्रसाद यांनी तासगावकर महाविद्यालयाबाबत असलेल्या तक्रारी आणि चौकशीअंती आढळून आलेले मुद्दे यांचा सभागृहात खुलासा केला तसेच समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करावी अशी विनंती केली.

नेने आणि तासगावकर महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यापीठाच्या अनेक प्राधिकरणांवर काम करतात पण त्यांच्या महाविद्यालयातील ज्या तक्रारी/प्रश्न आहेत ते त्यांनी सोडवणे आवश्यक आहे. विल्सन महाविद्यालयाबाबत नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर अजुन कार्यवाही का करण्यात आली नाही? वुमन डेव्हलपमेंट सेलने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठ कारवाई का करत नाही? आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स प्रमाणेच सेल्फ इंजिनिअरिंग कॉलेजसाठी करिअर ॲडव्हान्समेंट कॅम्प घेण्यात यावा. विद्यापीठ अधिनियमाप्रमाणे एल.एम.सी अहवाल प्रत्येक महाविद्यालयाने विद्यापीठाला सादर करणे आवश्यक आहे आणि विद्यापीठाने तपासणी करून काही त्रुटी असल्यास तसे महाविद्यालयास कळविणे आवश्यक आहे पण असे होते का याचा खुलासा करावा अशी मागणी श्रीमती अनुपमा सावंत यांनी केली.

यु.जी.सी च्या नियमानुसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये तक्रार निवारण समिती आणि स्पेशल सेल असणे आवश्यक आहे तरी त्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे. पुणे, नागपूर, औरंगाबाद विद्यापीठाच्या धर्तीवर नेट/सेट बाधित शिक्षकांना करिअर ॲडव्हान्समेंटचे फायदे देण्यात यावेत आदी सूचना डॉ. विजय पवार यांनी केल्या.

माईनर रिसर्च प्रोजेक्टवर विद्यापीठ ज्या प्रमाणात खर्च करते त्याप्रमाणात आऊटपूट मिळते का? आयडॉलच्या गेस्ट हाऊसची दुरावस्था झालेली आहे. आर्मी गेस्ट हाऊसमधील काही रूम विद्यापीठाला वापरण्यासाठी देण्यात याव्यात अशी अट करारामध्ये असताना देखील विद्यापीठाला रूम वापरण्यासाठी देण्यात येत नाहीत. वुमन डेव्हलपमेंट सेलच्या को-ऑर्डिनेटरना देण्यात आलेल्या बंगालोंचा वापर इतर खाजगी कारणांसाठी केला जातो. वुमन डेव्हलपमेंट सेलच्या सदस्यांवर कोणत्याही प्रकारची चौकशी अथवा आरोप असता कामा नये तसेच सदर सदस्यांची नावे व मोबाईल नंबर विद्यापीठाच्या आवारात उपलब्ध असणे आवश्यक आहे. मुलींच्या वसतीगृहाचे काम लवकरात लवकर पूर्ण केले जावे. मुंबई विद्यापीठाच्या आवारात स्त्री कर्मचा-यावर झालेल्या प्रसंगाच्या अनुषंगाने संबंधितांवर तात्काळ कारवाई होणे आवश्यक आहे आदी मुद्दे श्री. संजय वैराळ यांनी उपस्थित केले.

इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना इंटरनल के.टी लागू केल्यामुळे गोंधळ निर्माण झाला आहेत त्यामुळे ही सिस्टीम रिव्हाईज करावी अशी सूचना डॉ. विवेक देशमुख यांनी केली.

स्थगन प्रस्तावावर चर्चा करत असताना सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना होणा-या चर्चेत सहभाग घेता यावा म्हणुन प्रत्येकाने स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने मोजकेच बोलावे, परिनियमातील तरतुदीनुसार पंधरा मिनिटापेक्षा जास्त बोलता येत नसून अध्यक्षांना देखील वेळ वाढवून देता येत नाही, अशा प्रकारची माहिती प्राचार्य मुरलीधर कु-हाडे यांनी सभागृहास दिली.

सेमिस्टर सिस्टीममुळे प्राध्यापकांना शॉर्ट टर्म कोर्स, ओरिएन्टेशन, सेमिस्टर, पब्लिकेशन यांना वेळ मिळत नाही. ग्रामीण भागामध्ये सोयी-सुविधा अपु-या असल्यामुळे कॅस कॅम्प कलिना कॅपस येथे घेण्यात यावा अशी विनंती श्री. दिपक बीडवई यांनी केली.

चर्चेत सहभागी होतांना पेंढारकर, नेणे, विल्सन, तासगावकर, चिंचणी, बु-हाणी आदी महाविद्यालयांबाबत अनेक तक्रारी असून सदर महाविद्यालयांवर विद्यापीठाने तात्काळ कारवाई करावी. शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या ज्या काही तक्रारी आहेत त्या महाविद्यालय स्तरावरच सोडविण्यात याव्यात अशी सक्ती करू नये कारण अन्याय करणाराच न्याय देऊ शकणार नाही. काही महाविद्यालयात पूर्ण ॲडमिशन होऊन देखील शिक्षकांना पूर्ण पगार, कॅसचा लाभ दिला जात नाही तरी यावर विद्यापीठ काय कार्यवाही करणार आहे? मुंबई विद्यापीठामध्ये जे सुरक्षा रक्षक प्रामाणिकपणे आपले काम करतात त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना न्याय द्यावा. करिअर ॲडव्हान्समेन्ट स्किमचा फायदा सर्व शिक्षकांना मिळणे आवश्यक आहे आदी मुद्दे डॉ. अभय बांबोले यांनी उपस्थित केले.

काही प्रश्नांचा खुलासा होण्यासाठी सहसंचालक अधिसभेला उपस्थित असणे आवश्यक आहे. शिक्षकांचा पगार महिन्याच्या सुरूवातीला होत नाही तसेच जे शिक्षक निवृत्त झाले आहेत त्यांना वेळेवर पेन्शन मिळत नाही. अनेक शिक्षकांना कॅसचा लाभ मिळत नाही. विल्सन महाविद्यालयाबाबत अनेक गंभीर तक्रारी असून नेमलेल्या समितीने अहवाल सादर केला असूनदेखील विद्यापीठाने आतापर्यंत का कारवाई केली नाही? आदी प्रश्न श्रीमती संगिता गोडबोले यांनी उपस्थित केले.

मुंबई विद्यापीठातील स्त्री कर्मचारीबरोबर जो प्रसंग घडला, तो प्रसंग अतिशय गंभीर असून संबंधितांवर अजुनदेखील कारवाई का झालेली नाही? असा प्रश्न डॉ. (श्रीमती) सुप्रिया करंडे आणि श्रीमती निलिमा भूर्के यांनी उपस्थित केला.

परीक्षा संपल्यानंतर ४५ दिवसात निकाल जाहीर करावा अशी तरतूद आहे पण रिव्हॅल्युएशनचा निकाल किती दिवसांत लावण्यात यावा याबाबत कोणताही नियम नाही आणि म्हणुन रिव्हॅल्युएशनचा निकाल वेळेत लावण्याच्या दृष्टीने योग्य नियोजन होणे आवश्यक आहे तरी याबाबत योग्य तो विचार व्हावा असे मत ....मेश्राम यांनी मांडले.

स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने मांडलेल्या मुद्यांबाबत मा. कुलगुरूंनी खुलासा/आश्वासन द्यावे अशी विनंती डॉ. वसंत शकडे यांनी केली.

स्त्री कर्मचारीबाबत झालेला प्रसंग गंभीर असून याबाबत कायद्याच्या अनुषंगाने एक महिन्याच्या आत तक्रारदाराला न्याय देण्यात यावा असे असे निर्देश मा. कुलगुरूंनी प्रशासनास निर्देश दिले.

स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने मांडलेल्या मुद्यांपैकी काही मुद्दे वैयक्तीक स्वरूपाचे तक्रार निवारण समितीकडील, काही जनरिक असून काही प्रश्नांबाबत योजना व बदल आखणे गरजेचे आहे. केंद्र शासनाच्या कायद्याच्या आणि व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयाच्या अनुषंगाने एप्रिल महिन्यामध्ये नव्याने वुमन डेव्हलपमेंट सेल स्थापन करण्यात येणार आहे. पेंढारकर, तासगावकर, नेने आणि विल्सन महाविद्यालयाबाबत ज्या काही तक्रारी प्राप्त असतील त्या अनुषंगाने आणि समितीने सादर केलेल्या अहवालाचा आधार घेवून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ सेक्शन ९१ आणि ९२ मधील (८१) नुसार विद्यापीठ कारवाई करेल. परीक्षांचे निकाल तसेच रिव्हॅल्युएशन बाबत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुधारणा करणे आवश्यक आहे आणि त्याअनुषंगाने प्रशासन त्यामध्ये विशेष सुधारणा करील. करिअर ॲडव्हान्स स्किम बाबत तातडीने ज्या उपाययोजना करता येतील त्या केल्या जातील. बी.ओ.ई ने जे निर्णय घेतले आहेत त्यावर तात्काळ कार्यवाही केली जाईल.

तसेच विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्रमाण वाढलेले असून विद्यार्थ्यांचे ॲस्पिरेशन, उच्च शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करणे आणि सरकारी महाविद्यालये स्थापन होत नसल्याने काही व्यक्तींची मदत घेऊन शिक्षकांच्या वेतनाच्या समस्या सुटण्याकरिता सॅलरी रेग्युलेशन बील मांडण्याबाबत सदनाने विचार करावा असे मत मा. कुलगुरूंनी व्यक्त केले.

अधिवेशन असल्यामुळे सहसंचालक अधिसभेला हजर राहू शकले नाहीत. आरोग्य केंद्राबाबतचा प्रश्न सायन आणि के.ई.एम हॉस्पिटलची मदत घेऊन सोडविण्यात येईल तसेच एप्रिल महिन्यामध्ये डॉक्टर पदासाठी जाहिरात देण्यात

येईल. विद्यापीठामध्ये जवळ जवळ ९०० ते ११०० विद्यार्थ्यांची राहण्याची सोय होईल अशा वसतीगृहांचे काम चालू आहे तसेच काही वसतीगृहांमध्ये गेस्ट हाऊसची व्यवस्था करण्यात येणार आहे आणि यासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मागविण्यात आलेले आहे. तसेच स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने काही महत्वाचे प्रश्न असतील त्याअनुषंगाने ७ किंवा ८ एप्रिल २०१५ रोजी बैठक घेण्यात येईल. असा खुलासा मा. कुलगुरूंनी चर्चेला उत्तर देतांना केला.

चिंचणी महाविद्यालयाबाबत योग्य ती कारवाई करावी, महाविद्यालयातील तक्रारी महाविद्यालय स्तरावर सोडविण्यात याव्यात अशाप्रकारचे विद्यापीठाने पाठविलेले परिपत्रक मागे घेण्यात यावे, बी.ओ.ई मार्फत निकाली काढण्यात आलेली प्रकरणे १५ मे पर्यंत व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावी. पी.एचडी बाबत समकक्षमता देणारी एक समिती स्थापन करण्यात यावी. आदी मुद्यांबाबत खुलासा करावा अशी विनंती डॉ. वसंत शेकडे यांनी व्यक्त केली.

चिंचणी महाविद्यालयाबाबत कायद्याच्या अनुषंगाने कारवाई करण्यात येईल, शिक्षकांच्या किरकोळ रजेबाबत जे शासनाचे नियम आहेत ते लागू राहतील व त्यासंबंधित परिपत्रक महाविद्यालयांना पाठविण्यात येईल. सुरक्षा रक्षक/कंत्राटी कर्मचा-यांबाबत निर्णय घेण्यासाठी ४ एप्रिल २०१५ रोजी बैठक घेण्यात येईल. असा खुलासा मा. प्र-कुलगुरूंनी चर्चेला उत्तर देतांना केला.

मा. कुलगुरू आणि मा. प्र-कुलगुरू यांनी केलेल्या खुलाशाअंती तसेच स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी मांडलेले मुद्दे, केलेली चर्चा तसेच प्रशासनाने दिलेला प्रतिसाद याबद्दल आभार व्यक्त करून डॉ. वसंत शेकडे यांनी आपला स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

सन्माननीय सदस्यांनी अतिशय पोटतिडकिने वेगवेगळे मुद्दे मांडले. अनेक वेगवेगळे प्रश्न सुटणे आवश्यक आहे आणि म्हणुन विद्यार्थी/शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या हिताच्या दृष्टीने जसे महाराष्ट्र शासन महाराष्ट्र गॅरंटी पब्लिक सर्व्हिसेस बिल २०१५ आणणार आहे त्याच धर्तीवर विद्यापीठाने गॅरंटी ऑफ सर्व्हिसेस टू स्टूडन्टस् ॲन्ड टीचर्स अशाप्रकारची सनद करण्याचा ठराव मंजूर करावा. यामध्ये विद्यार्थी/शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांना किती दिवसात विशिष्ट सेवा मिळावी याचा समावेश असावा. To provide transferent, efficient and timely services, To bring transferency and acountability in department हा या बिलाचा उद्देश असेल. तसेच याद्वारे संबंधित व्यक्तीला सदर अर्जाचा युनिक नंबर दिला जाईल व त्याला आपल्या अर्जाची सध्यस्थिती तपासता येईल तसेच गैरप्रकारास आळा बसेल. असा ठराव सन्माननीय सदस्य प्रा. आंबादास मोहिते यांनी मांडला.

वरील ठरावार प्राचार्य सिध्देश्वर गडदे यांनी अनुमोदन दिले.

सन्माननीय सदस्य प्रा. आंबादास मोहिते यांनी मांडलेला ठराव मंजूर केल्यास विद्यार्थी/शिक्षक/शिक्षकेत्तर यांचे हित साधले जाईल असे नमूद करून डॉ. डी.वाय.पाटील यांनी ठरावास पाठिंबा दिला.

सन्माननीय सदस्य प्रा. आंबादास मोहिते यांनी मांडलेल्या ठरावास पाठिंबा देऊन राज्य शासनाच्या वतीने जी काही मदत लागेल ती करण्याची तयारी श्री. प्रदिप सावंत यांनी दर्शवली.

सदर ठराव मंजूर केल्यास पारदर्शकता निर्माण होईल व विद्यार्थी/शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे हित साधले जाईल अशी भावना व्यक्त करून श्री. प्राचार्य रोकडे, डॉ. सलीम पटेल आणि श्री. सुधाकर तांबोळी यांनी वरील ठरावास पाठिंबा दर्शविला.

सन्माननीय सदस्य प्रा. अंबादास मोहिते यांनी मांडलेला ठराव मा. कुलगुरूंनी सभागृहात सादर केला असता सभागृहाने सदर ठराव एकमताने मंजूर केला.

**बाब क्र ३ : २०१५-२०१६ या वित्तीय वर्षासाठी विद्यापीठाचा अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०१४-२०१५ वर्षाकरिता सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज.**

............................................................................................................................

शिलवृत्तफला विद्या या उदात्त अशा ध्येयाने निर्माण झालेल्या विद्यापीठामध्ये अधिसभा तसेच सर्व प्राधिकरणांच्या सदस्यांनी सेवाभावी वृत्तीने काम केले. मा. कुलगुरू यांच्या सक्षम व दुरदर्शी नेतृत्वाखाली तसेच इतर प्रशासन अधिका-यांच्या माध्यमातून विद्यापीठामध्ये इंडियन सायन्स कॉंग्रेस पार पडले, विद्यापीठाच्या गुणवत्तेचे मुल्यांकन करण्यात आले तसेच इन्फ्रास्टक्चरबाबत, उपकेंद्रांबाबत, ॲकॅडमिक रिफॉर्म, एक्झामिनेशन रिफॉर्मस्, ॲडमिनिस्ट्रेशनबाबत, खूप चांगल्या सुधारणा व कामे झालेली आहेत. यासाठी जे योगदान दिले त्याबद्दल सर्व प्राधिकरणांच्या सदस्यांच्या तसेच प्रशासनाच्या अभिनंदनाचा ठराव प्राचार्य गोरक्ष पारगावकर यांनी मांडला.

वरील ठरावास प्राचार्य सिध्देश्वर गडदे यांनी अनुमोदन दिले.

गेल्या पाच वर्षांमध्ये विविध समस्या/प्रश्न सोडविण्याबाबत प्रशासनाने जे सहकार्य केले त्याबद्दल मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव,

मा. बी.सी.यु.डी डायरेक्टर आणि इतर सहका-यांचे तसेच सर्व सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल श्री. निलिमा भुर्के आणि डॉ. अभय बांबोले यांनी आभार व्यक्त केले.

गेल्या पाच वर्षांमध्ये इंडियन सायन्स कॉंग्रेस, इंडियन हिस्ट्री कॉंग्रेस सारखे कार्यक्रम विद्यापीठामध्ये पार पडले. १०२ नवीन कोर्सेस निर्माण झाले, महाविद्यालयांमध्ये शिक्षकांची पदे भरली गेली, तसेच संशोधनाबाबत देखील अनेक सुधारणा करण्यत आल्या आदी मुद्दे नमूद करून प्रशासनाचे तसेच सन्माननीय सदस्यांचे डॉ. (श्रीमती) शेफाली पंडया यांनी आभार मानले.

गेल्या पाच वर्षांमध्ये वेळोवेळी अनेक समस्यांबाबत चुका दाखविण्याचे काम करतांना आम्ही ज्या भावना व्यक्त केल्या त्या कोणा एका व्यक्तीविरोधात नसून विद्यापीठाची स्थिती सुधारावी याकरिता ते प्रयत्न होते असे नमूद करून प्रशासन तसेच सन्माननीय सदस्यांचे बुकटोच्या वतीने डॉ.(श्रीमती) मोहसिना मुकादम यांनी आभार मानले.

यानंतर सन्माननीय सदस्यांनी मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, मा.कुलसचिव, आणि बी.सी.यु.डी डायरेक्टर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दादा इदाते यांची विमुक्त जनजाती आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल, सन्माननीय सदस्य श्री. प्रदिप सावंत यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचारी बॅंकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल, सन्माननीय सदस्य श्री. संजय शेटे यांची सातारा सहकारी बॅंकेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तसेच श्री.बिंदूप्रकाश मिश्रा यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

महिला सुरक्षेच्यादृष्टीने करण्यात आलेली महिला सुरक्षा रक्षकांची भरती तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या दीक्षान्त सभागृहामध्ये पदवी देण्याचा जो कार्यक्रम झाला तो आतिशय अभिनव उपक्रम आहे आदी गोष्टी नमूद करून श्रीमती कविता लघाटे यांनी विद्यापीठाचा दर्जा उंचावण्याकरिता सन्माननीय सदस्यांनी जे योगदान दिले त्याबद्दल आभार व्यक्त केले.

या पाच वर्षामध्ये विद्यापीठामध्ये काम करून बाहेर पडतांना खूप समाधान वाटते, मुंबई विद्यापीठामध्ये तसेच या अधिसभेमध्ये काम करतांना खूप काही शिकावयास मिळाले, वेगवेगळ्या समित्यांवर काम करावयास मिळाले अशा भावना प्रा. अंबादास मोहिते यांनी व्यक्त करून मा.कुलगुरू, प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. बी.सी.यु.डी डायरेक्टर यांचे विशेष आभार मानले. तसेच प्रामाणिकपणे काम

केल्याबद्दल श्री. संतोष सोनवणे आणि त्यांच्या सहका-यांचे अभिनंदन केले. तसेच सर्व कर्मचारी व विद्यापीठाच्या प्राधिकरणाचे सदस्य, अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्य यांच्या सहकार्याबद्दल राज्यपाल नियुक्त सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने अभिनंदल केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताह हा एक अत्यंत चांगला कार्यक्रम विद्यापीठामध्ये साजरा केला जातो पण सदर कार्यक्रम पाच वर्षापुरता मर्यादित न ठेवता तसाच पुढे चालू ठेवावा अशी विनंती केली तसेच विद्यापीठातील उपकुलसचिव, सहायक कुलसकचिव आणि सर्व कर्मचा-यांबद्दल डॉ. (श्रीमती) सुनिता विठ्ठलराव मगरे यांनी ऋण व्यक्त केले.

डॉ. बाळकृष्ण भोसले यांनी पदव्युत्तर शिक्षकांच्या वतीने प्रशासनाचे आणि सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त केले तसेच या पाच वर्षात मुंबई विद्यापीठ तसेच मा. कुलगुरूंपुढे जी संकटे उभी राहिली त्यातुन संयम नावाची गोष्ट आम्हाला मा. कुलगुरूंकडुन शिकावयास मिळाली अशी भावना व्यक्त करून पुढील आयुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केली.

डॉ. झाहीर काझी यांनी मुंबई विद्यापीठाबद्दल अभिमान व्यक्त करून गेल्या पाच वर्षामध्ये खूप चांगली सुधारणा/कामे झाली असून मुंबई विद्यापीठ हे देशातील विद्यापीठामधील एक उत्कृष्ठ विद्यापीठ असल्याचे नमूद केले. आणि सर्व अधिसभा सदस्य, मा.कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. बी.सी.यु.डी डायरेक्टर आणि इतर कर्मचा-यांचे अभिनंदन केले.

मुंबई विद्यापीठामध्ये संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ म्हणुन काम करतांना मा.कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, प्राचार्य मुरलीधर कु-हाडे यांचा सहवास लाभला, तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी पाच वर्षे जे प्रेम दिले त्याबद्दल ऋण व्यक्त करून सर्वांना प्राचार्य राजपाल हांडे यांनी धन्यवाद दिले.

परीक्षांचे निकाल ३० ते ४५ दिवसांत लावण्यासाठी प्राचार्यांनी, शिक्षकांनी विद्यापीठाला मदत करण्याचे आवाहन करून मा. प्र-कुलगुरूंनी सर्व सदस्यांचे आभार मानले.

मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर अधिसभा सदनामध्ये काम पाहण्याचा अनुभव नसल्याने मी देखील अधिसभा सदस्यांप्रमाणेच नवीन होतो आणि गेल्या पाच वर्षामध्ये मलादेखील बरेच काही शिकावयास मिळाले असून त्याचा भविष्यात खूप फायदा होईल. तसेच एखाद्या प्रश्नाबाबत ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांच्या संवेदना होत्या त्याचप्रमाणे प्रशासनाच्याही होत्या असे नमूद करून मा. कुलगुरूंनी सर्वांना धन्यवाद दिले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

मुंबई – ४०० ०३२
१९ नोव्हेंबर, २०१५

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)